## राज्यसेवा विविध संवर्गाच्या मुख्य परीक्षेची तारीख जाहीर

**मुंबई :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्वपरीक्षेनंतर आता विविध १६ संवर्गाच्या मुख्य परीक्षेची तारीख जाहीर करण्यात आलेली आहे. राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२३ची अधिसूचना आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली असून अर्ज सादर करण्याचा कालावधी ७ ते २१ नोव्हेंबर तर परीक्षा २०, २१ व २२ जानेवारी २०२४ रोजी होतील. अधिसूचनेमध्ये म्हटलेय की, ४ जून रोजी घेण्यात आलेल्या पूर्व परीक्षेचा निकाल ६ सप्टेंबर रोजी जाहीर करण्यात आला होता. त्या निकालाच्या आधारे आता मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी ठरलेल्या उमेदवारांची ऑफलाईन पद्धतीने अमरावती, छत्रपती संभाजी नगर, नागपूर, नाशिक, नवी मुंबई आणि पुणे जिल्हा केंद्रांवर परीक्षा होणार आहे.

रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक १०८
www.ramprahar.com
शनिवार, ४ नोव्हेंबर २०२३ ◆पाने ८◆किंमत ₹ २

### अंतरंग

बनावट व्हिसा वापरून राहणाऱ्या विदेशी महिलेवर कारवाई/३
रायगडातून १२४६ सदस्य, १६८ सरपंच रिंगणात/५
रोलर स्केटिंग स्पर्धेत 'सीकेटी'चा विनीत जाधव चॅम्पियन/८

# महाड एमआयडीसीत भीषण स्फोट
# तीन जण ठार; आठ बेपत्ता





**महाड : प्रतिनिधी**

महाड एमआयडीसीमधील अतिरिक्त औद्योगिक क्षेत्रात असलेल्या ब्ल्यू जेट हेल्थकेअर लिमिटेड या कंपनीत शुक्रवारी (दि. ३) सकाळी १० वाजण्याच्या सुमारास भीषण स्फोट झाला. या स्फोटात तिघांचा मृत्यू झाला असून आठ जण अद्यापही बेपत्ता झाल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे. सात कामगार जखमी झाले आहेत. जखमींना एमएमएसीइटीपी हॉस्पिटलमध्ये उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे.

## सात कामगार जखमी

ब्ल्यू जेट हेल्थकेअर लिमिटेड हेल्थकेअर कंपनीमध्ये शुक्रवारी सकाळी आग लागून भीषण स्फोट झाला. यानंतर प्लांटमध्ये असलेल्या एका रिएक्टरचा स्फोट झाला. यामुळे आग पसरली आणि इतर रिएक्टर्सचे एका मागून एक असे स्फोट झाले. या स्फोटांच्या दणक्याने कामगार जिकडे वाट मिळेल तिकडे पळू लागले. शेजारी असलेल्या कंपनीतील कामगारांनीदेखील कंपनी बाहेर पडून सुरक्षित ठिकाणी आश्रय घेतला. ज्या प्लांटला आग लागली त्या प्लांटच्या शेजारीच विरल कंपनीचा प्लांट असल्याने कामगारांनी आग विझाण्यास सुरुवात केली. अग्निशमन दलाची पाच वाहने घटनास्थळी कार्यरत असून आजूबाजूच्या परिसरातून आणखी पाच वाहने मागविण्यात आलेली आहेत.

आगीचा भडका कमी झाल्यानंतर प्लांटमध्ये जाऊन कोणी व्यक्ती त्यात अडकला असल्यास त्यांना तत्काळ बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

कंपनीत सुमारे १७ कामगार होते. आग लागताच अनेकजणांनी कंपनी बाहेर पळ काढला, मात्र प्लांटमध्ये काम करणारे विक्रम डेरे, निमाई मुरमक, मयूर निंबाळकर, राहुल गिरासे, स्वप्निल आंब्रे हे कामगार जखमी झाले आहेत. या कामगारांना महाड उत्पादक संघटनेच्या हॉस्पिटलमध्ये दाखल केले आहे. यातील विक्रम डेरे हा गंभीररित्या जखमी झालेल्या असल्याने त्याला मुंबई येथे अधिक उपचाराकरीता स्थलांतरित करण्यात येणार असल्याची माहिती कंपनी प्रशासनाने दिली.

आगीत एकूण सात जण जखमी झालेल्या असून इतर आठ जण बेपत्ता आहेत. आग कमी करण्यासाठी अग्निशामन दलाचे व पोलिसांचे शर्तीचे प्रयत्न सुरू आहेत, असे पोलिसांनी सांगितले. एनडीआरएफचे पथक हेलिकॉप्टरद्वारे पुणे येथून बोलावण्यात आले आहे. हे पथक या प्लांटची पाहणी करून अडकलेल्या व्यक्तींचा शोध घेणार आहे. तीन मृत व आठ बेपत्ता असलेल्यांमध्ये जीवनकुमार चोबे, अभिमन्यू उरॉव, विकास महातो, शेषराव भुसारे, अक्षय सुतार, सोमीनाथ विधाते, विशाल कोळी, संजय पवार, असलम शेख, सतीश साळुंखे, आदित्य मोरे यांचा समावेश आहे.

## जनता भाजपच्या पाठिशी –आमदार प्रशांत ठाकूर

### दुंदरे येथे प्रचारसभेला उत्स्फूर्त प्रतिसाद



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कर्नाळा बँकेत घोटाळा करून गोरगरीब जनतेचे पैसे लुटणाऱ्या विवेक पाटीलांचा आदर्श घेण्यासाठी शेकापचे कार्यकर्ते बॅनरवर त्यांचा फोटो लावतात. त्यामुळे अशा भ्रष्टाचार करणाऱ्या नेत्याचा आदर्श ठेवणाऱ्यांना तुम्ही मतदान करणार की विकासाची गंगा आणून सर्वसामान्य जनतेला विविध योजनांच्या माध्यमातून दिलासा देणाऱ्या भारतीय जनता पक्षाच्या उमेदवाराला मत देणार? असा सवाल आमदार प्रशांत ठाकूर यांनी दुंदरे येथे प्रचारसभेत विचारला.

पनवेल तालुक्यात १७ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी येत्या ५ नोव्हेंबरला मतदान होणार आहे. त्या अंतर्गत भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत दुंदरे ग्रुप ग्रामपंचायतीमधील भाजप उमेदवारांच्या प्रचारार्थ शुक्रवारी (दि. ३) जाहीर सभा शुक्रवारी झाली. या सभेला मतदारांचा चांगला प्रतिसाद लाभला. या निवडणुकीमध्ये थेट सरपंच पदासाठी भारतीय जनता पक्षाच्या वतीने रमेश सीताराम पाटील तर सदस्यपदासाठी प्रभाग क्रमांक १मधून अमर शेळके, कमला वाघमारे, रेश्मा भोपी, **(पान २ वर..)**



**उरण : जासई ग्रुप ग्रामपंचायतीमधील भाजप उमेदवारांच्या प्रचारार्थ आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांच्या उपस्थितीत गुरुवारी प्रचारसभा झाली. थेट सरपंचपदासाठी बळीराम तुकाराम घरत, तर सदस्यपदासाठी प्रभाग क्रमांक १मधून तेजस पाटील, संदेश घरत; प्रभाग क्रमांक २मधून आनंद म्हात्रे, प्रतीक्षा म्हात्रे, भूषण म्हात्रे; प्रभाग क्रमांक ३मधून कुणाल म्हात्रे, ज्योती मढवी, पौर्णिमा कांबळे; प्रभाग क्रमांक ४मधून आदित्य घरत, दीपाली घरत, सीमा घरत; प्रभाग क्रमांक ५मधून दिनेश येरकर, जयश्री घरत, स्वप्नाली दामले; प्रभाग क्रमांक ६मधून दयानंद म्हात्रे, सिंधूबाई पवार, सुजाता पाटील हे उभे आहेत. या वेळी भाजपचे उरण तालुकाध्यक्ष रवी भोईर, चंद्रकांत घरत, धनाजी ठाकूर, सतीश घरत, सुधीर घरत, गोपीनाथ म्हात्रे, सुनील घरत यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. (छाया : संकेत भोईर)** **वृत्त पान ३ वर..**

## निवडक

### प्रसिद्ध मराठी उद्योजक अतुल बेडेकर यांचे निधन

**मुंबई :** बेडेकर लोणची, मसाले आणि पापड महाराष्ट्रात प्रसिद्ध आहेत. व्ही. पी. बेडेकर आणि सन्सचे संचालक अतुल बेडेकर यांचे शुक्रवारी (दि. ३) वयाच्या ५६व्या वर्षी निधन झाले. मागच्या महिनाभरापासून ते आजारी होते. चंदनवाडी स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. उपमुख्यमंत्री अजित पवार आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही त्यांना आदरांजली वाहिली आहे.

### विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे अलिबाग दौऱ्यावर

**मुंबई :** शिवसेना महिला संघटन अलिबागतर्फे दिवाळी सणानिमित्त 'उद्यम सखी' प्रदर्शन व विक्री दिवाळी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या हस्ते शनिवारी (दि. ४)होरायझन हॉल, खडताळ पूल, अलिबाग येथे होणार आहे.

### मराठा आरक्षणासाठी राज्य सरकार ॲक्शन मोडवर

## दर आठवड्याचा प्रगती अहवाल वेबसाईटवर –मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी गुरुवारी उपोषण मागे घेण्याचा निर्णय घेतला. यानंतर शुक्रवारी (दि. ३) मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी बैठक बोलावली होती. या वेळी त्यांनी कुणबी प्रमाणपत्र शोधण्यासाठी युद्धपातळीवर काम करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, जिल्हाधिकाऱ्यांनी स्वत: या प्रकरणात गांभीर्याने काम करावे. विभागीय आयुक्तांनी यावर जातीने लक्ष ठेवावे. मुख्यमंत्री कार्यालयाकडून याचा सतत आढावा घेतला जाईल. युद्धपातळीवर काम करण्याच्या सूचना मी प्रशासनाला दिल्या आहेत. विरोधकांनीदेखील सहकार्य करण्याची आवश्यकता आहे. विरोधी पक्षांची आम्ही बैठक बोलावली होती. त्यामध्ये शरद पवार, काँग्रेसचे नेतेदेखील उपस्थित होते. कायदेशीर आणि टीकणारे आरक्षण देण्यावर सर्वांचे एकमत झाले आहे. कायदा व सुव्यवस्था राज्यात राखली पाहिजे याबाबतही बैठकीमध्ये एकमत झाले. विरोधी पक्षांनी यावर सरकारला सहकार्य करावे, असे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.



राज्य सरकार प्रामाणिकपणे काम करीत आहे. युद्धपातळीवर काम केले जात आहे. आठवड्याभराचा प्रोग्रेसिव्ह रिपोर्ट जनतेसमोर सादर केला जाईल जेणेकरून जनतेला काय काम करत आहोत हे समजेल. आठवडाभर तपासलेल्या नोंदी नव्या वेबसाईटवर टाका, अशा सूचना दिल्या आहेत. टीआयसीसी, गोखले इन्स्टिट्यूट आणि अन्य एका संस्थेची यासाठी मदत घेतली जाणार आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले.

### सभास्थानामुळे नुकसान झालेल्यांना भरपाई

**जालना :** अंतरवाली सराटी येथे १४ ऑक्टोबर रोजी झालेल्या मनोज जरांगे-पाटील यांच्या सभेवेळी लाखोंची गर्दी जमली होती. या वेळी अनेक शेतकऱ्यांचे नुकसान झाले होते. या ४४१ बाधित शेतकऱ्यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून ३२ लाख रुपयांची नुकसान भरपाई देण्यात आली आहे. मराठा आरक्षण आंदोलनावेळी झालेल्या लाठीचार्जमध्ये जखमी झालेल्या आंदोलकांवरील उपचारासाठीही मुख्यमंत्री शिंदे यांनी विशेष बाब म्हणून मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून २५ लाखांहून अधिक रुपयांचे अर्थसहाय्य केले होते.

## अफगाणिस्तानचा विजयासह पाकिस्तानला मोठा धक्का

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

अफगाणिस्तानने वर्ल्ड कपमधील आपल्या चौथ्या विजयासह पाकिस्तानला एक मोठा धक्का दिला आहे, कारण अफगाणिस्तानच्या विजयाने आता गुणतालिकेत मात्र मोठा फेरबदल झाला आहे.

अफगाणिस्तान या सामन्यापूर्वी सहा सामने खेळला होता. या सहा सामन्यात त्यांना तीन विजय मिळवता आले होते, तर तीन सामन्यांत त्यांना पराभव पत्करावा लागला होता. त्यामुळे या तीन विजयांसह अफगाणिस्तानच्या संघाचे सहा गुण झाले आहे, पण त्यानंतर अफगाणिस्तानवर सात विकेट्स राखत विजय मिळवला. त्यामुळे या विजयासह अफगाणिस्तानच्या संघाला दोन गुण मिळाले आहेत. या दोन गुणांसह आता अफगाणिस्तानचे आठ गुण झाले आहेत.

### गुणतालिकेत मोठा उलटफेर



अफगाणिस्तानच्या संघाने पाकिस्तानला मोठा धक्का दिला आहे, कारण या सामन्यापूर्वी अफगाणिस्तानचा संघ हा सहाव्या स्थानावर होता, तर पाकिस्तानचा संघ हा पाचव्या स्थानावर होता. पाकिस्तानच्या संघाचे सहा गुण होते, पण आता अफगाणिस्तानच्या संघाने चौथा विजय मिळवला आणि त्यामुळे त्यांचे आता आठ गुण झाले आहेत. त्यामुळे आता अफगाणिस्तानच्या संघाने गुणतालिकेत पाकिस्तानला मोठा धक्का दिला आहे.

## मुरूडच्या समुद्रकिनारी शेकडो सी-गल पक्ष्यांचे आगमन



**मुरूड : रामप्रहर वृत्त**

मुरूडला दरवर्षी सप्टेंबरला येणारे हे परदेशी पक्षी यावर्षी नोव्हेंबरच्या सुरवातीला आले आहेत. मुरूडचा समुद्रकिनारा सकाळी या पक्ष्यांनी भरलेला असतो.

सी-गल्स उत्तर अमेरिका, युरोप, आशिया, आफ्रिका आणि ऑस्ट्रेलियासह बहुतेक खंडांच्या किनारपट्टीजवळ आढळतात. ते तलाव, नद्या आणि मुहाने यांसारख्या मोठ्या पाण्याच्या जवळदेखील राहतात. ते त्यांच्या सफाईच्या सवयींसाठी ओळखले जातात. सी-गल्स वसंत ऋतू आणि उन्हाळ्याच्या महिन्यांत प्रजनन करतात. ते किनाऱ्याजवळील जमिनीवर घरटे बांधतात आणि वर्षानुवर्षे तेच घरटे वापरतात. घरटे काठ्या आणि गवताचे बनलेले असते आणि मादी दोन ते तीन अंडी घालते. दोन्ही पालक आळीपाळीने अंडी उबवतात आणि पिलांना खायला देतात. सी-गलची पिल्ले भुरकट राखाडी रंगाची जन्माला येतात आणि त्यांच्या पालकांच्या आहारात ते वेगाने वाढतात.

सी-गल्सच्या काही प्रजाती या स्थलांतरित आहेत आणि ते हिवाळ्याच्या दिवसात उबदार हवामानात खूप अंतरावर उड्डाण करतात. मुरूडच्या पर्यटन वाढीसाठी सीगल पक्ष्यांची मदत नेहमीच होत आली आहे. दिवाळी हंगामात हे पक्षी आल्याने पर्यटक ते पाहण्यासाठी व अभ्यास करण्यासाठी मुरूडला येतात. मुरूडचा शांत किनारा पक्ष्यांचे आवडतो, परंतु दिवाळी होणाऱ्या फटकेबाजीचा त्यांना त्रास होतो. फटाक्याचा आवाज होताच पक्षी पद्मदुर्ग किल्ल्याजवळ किनाऱ्यावर स्थलांतरित होतात. काही दिवस ते किनाऱ्यावर दिसत नाहीत.

## प. रेल्वेचा मेगाब्लॉक अंतिम टप्प्यात

**मुंबई : प्रतिनिधी**

पश्चिम रेल्वेवर खार-गोरेगावदरम्यान सहाव्या मार्गिकेच्या कामासाठी सुरू असलेल्या ब्लॉक आता अंतिम टप्प्यात आलेला आहे. प्रवाशांचा त्रास कमी करण्यासाठी पश्चिम रेल्वेने शनिवारी १६८ लोकल पूर्ववत करणार आहे.

पश्चिम रेल्वेवर २९ दिवसांच्या ब्लॉकचे घेऊन पाचव्या आणि सहाव्या मार्गिकेचे काम सुरू केले आहे. हे काम खार ते गोरेगाव दरम्यान सुरू असल्याने पश्चिम रेल्वे मार्गावरील लोकल फेऱ्या रद्द केल्या आहे. त्यामुळे प्रवाशांचे मोठे हाल सुरू आहेत. प्रवाशांची कोंडी लक्षात घेता पश्चिम रेल्वेने रद्द केलेल्या ३१६ लोकल पूर्ववत करण्यावर भर दिला आहे, तसेच शनिवारी रद्द केलेल्या नियोजित ३१६ लोकल फेऱ्यांपकी १६८ लोकल पूर्ववत करणार आहे.

## अभिनंदन!



**पनवेल : स्वच्छता मॉनिटर प्रकल्पात जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या द्रोणागिरी येथील श्रीमती भागुबाई चांगु ठाकूर विद्यालयाने सलग दुसऱ्या वर्षीही रायगड जिल्ह्यातून प्रथम क्रमांक मिळविला आहे. याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मुख्याध्यापिका अनुराधा काठे, सहाय्यक शिक्षिका सोफिया शेख यांच्यासह विद्यार्थ्यांचा शुक्रवारी सत्कार केला.**

# धूळ नियंत्रणासाठी मुंबईतील ६५० किमीचे रस्ते धुणार

## रस्ते धुण्यासाठी १२१ टँकर व इतर संयंत्रे, मनुष्यबळ तैनात

**मुंबई : प्रतिनिधी**

हवेतील प्रदुषणाला कारणीभूत ठरणारी धूळ नियंत्रित करण्याच्या दृष्टीने मुंबई महानगरपालिकेने उपाययोजनांना गती दिली आहे. याअंतर्गत सर्व २४ प्रशासकीय विभागांमध्ये ६० फुटांपेक्षा अधिक रुंदीचे रस्ते, वर्दळीचे पदपथ स्वच्छ करुन ते पाण्याने धुवून काढण्याची कामे हाती घेण्यात आली आहेत. पहाटे ३ ते सकाळी ६ दरम्यान रस्ते धुण्याचे काम केले जात आहे. त्यासाठी पाण्याचे १२१ टँकर व इतर संयंत्रे, मनुष्यबळ नेमण्यात आले आहेत.




पुनर्प्रक्रिया केलेल्या तसेच स्थानिक स्रोतांमधील पाण्याचा यामध्ये प्रामुख्याने वापर केल्याने पाण्याची नासाडी होणार नाही, असा विश्वास पालिकेने व्यक्त केला आहे. वायू प्रदूषण नियंत्रण उपाययोजनांना वेग देण्यासाठी अतिरिक्त आयुक्त डॉ. सुधाकर शिंदे यांनी शुक्रवारी बैठक घेतली. २४ प्रशासकीय विभागांतील ६० फुटांपेक्षा अधिक रुंदीच्या रस्त्यांवर तसेच पदपथांवर दररोज विशेष स्वच्छता केली जात आहे.

रस्ते व पदपथांवर प्रारंभी ब्रशिंग करून नंतर पाणी फवारणी केली जात आहे. ज्या रस्त्यांवर तसेच पदपथांवर अशी कार्यवाही करावयाची आहे, त्यांची निवड विभाग कार्यालयांनी केलेली आहे.

जिथे वाहनांची व नागरिकांची अधिक वर्दळ असते, अशा रस्ते व पदपथांवर अधिक लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. पुनर्प्रक्रिया केलेल्या पाण्याचा त्याचप्रमाणे विभागातील पाण्याचे स्थानिक स्रोत (तलाव, विहीर, कूपनलिका) यामधील पाण्याचा वापर करुन रस्ते व पदपथ धुतल्याने पिण्याच्या पाण्याची नासाडी होणार नाही, याची काळजी घेतली जात असल्याचे उप आयुक्त (घन कचरा व्यवस्थापन ) चंदा जाधव यांनी सांगितले.

नागरिकांच्या दैनंदिन जीवनमानात व्यत्यय येवू नये यासाठी कमी वर्दळीच्या कालावधीमध्ये पहाटे ३ ते सकाळी ६ दरम्यान,तर काही विभागांमध्ये वर्दळ कमी असल्यास दुपारच्या अथवा सायंकाळच्या सत्रात कार्यवाही केली जात आहे.

## श्रीवर्धनमध्ये पाण्यासाठी वारंवार खोदकाम; नागरिक त्रस्त

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन शहरातील जलवाहिन्या बदलण्याचे काम मागील वर्षी पावसाळा संपल्यानंतर हाती घेण्यात आले होते. रानवली तलावाजवळ नव्याने बांधण्यात आलेल्या जलशुद्धीकरण प्रकल्पापासून श्रीवर्धन शहराजवळ असलेल्या साठवण टाक्यांपर्यंत जलवाहिन्या टाकून झाल्या होत्या, तर शहरातील बहुतांश भागातील जलवाहिन्या टाकून पूर्ण झाल्या होत्या, मात्र पावसाळा सुरू झाल्यामुळे हे काम ठेकेदाराला अर्धवट अवस्थेत ठेवावे लागले होते.

अनेक ठिकाणी जलवाहिन्या बदलण्यासाठी खोदकाम झाल्यानंतर, त्यावेळी खोदकाम केलेल्या ठिकाणी केवळ खडी टाकून काम अर्धवट सोडून देण्यात आले होते, परंतु आता पावसाळा संपल्यानंतर ठेकेदाराने बऱ्याच भागातील काम पूर्णत्वाकडे नेण्यासाठी सुरुवात केली आहे. जलशुद्धीकरण प्रकल्पातून साठवण टाक्यांमध्ये येणारे शुद्ध पाणी जलवाहिन्यांना जोडण्यासाठी पुन्हा एकदा बऱ्याच ठिकाणी शहरात खोदकाम करावे लागले. यामुळे नागरिकांना विनाकारण त्रास सहन करावा लागत होता.

श्रीमंत पेशवे प्रवेशद्वारापासून आंबेडकर चौकापर्यंत श्रीवर्धन शहरात कमीत कमी २० ते २२ ठिकाणी पुन्हा खोदकाम करावे लागले. जलशुद्धीकरण प्रकल्पाचा उद्घाटन समारंभ बाकी असला तरीही नगर परिषदेने प्रायोगिक तत्त्वावर जलशुद्धीकरण प्रकल्प सुरू केला आहे.

सध्या नागरिकांना देण्यात येत असलेले पाणी हे शुद्ध करून येत आहे. यापुढे नागरिकांनीही पाण्याचा अपव्यय करू नये. पाण्याचा उपयोग न करता केवळ पिण्यासाठी पाणी वापरावे जेणेकरून उन्हाळ्यात नागरिकांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागणार नाही.

ज्या ज्या ठिकाणी खोदकाम करण्यात आलेले होते त्या ठिकाणी राजकीय सभा होणा म्हणून तातडीने डांबरीकरण करण्यात आले, परंतु अनेक ठिकाणी केवळ अद्याप खडी टाकून काम अर्धवट सोडून देण्यात आलेले आहे. श्रीवर्धन नगर परिषदेने अर्धवट राहिलेले काम तातडीने पूर्ण करून घ्यावे व नागरिकांना विनाकारण त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी, अशी मागणी शहरवासीयांमधून होत आहे.

> **शुद्धीकरण करण्यात आलेले पाणी जलवाहिन्यांना जोडण्यासाठी शहरांमध्ये अनेक ठिकाणी खोदकाम करावे लागले होते, परंतु आता यापुढे हे काम पूर्ण झाले असल्याने कोठेही कोदकाम करावे लागणार नाही. ज्या ठिकाणी रस्त्याची कामे अपूर्ण आहेत तीदेखील तातडीने पूर्ण करण्यात येतील.**
>
> **–विराज लबडे, मुख्याधिकारी तथा प्रशासक, श्रीवर्धन नगर परिषद**

## आंबिवली येथे सोलर पॅनेल स्ट्रीट लाईटचे उदघाटन



**कर्जत : प्रतिनिधी**

मागील अनेक दिवसांपासून आंबिवली येथील स्ट्रीट लाईटची समस्या होती. माधवीताई जोशी युवा प्रतिष्ठानच्या वतीने सोलर स्ट्रीट लाईट लावण्यात आल्या. या स्ट्रीट लाईटचे लोकार्पण करण्यात आले.

आंबिवली रस्त्यावर लाईट नसल्याने रस्त्यावरील खड्डे, श्वापदांची भीती या अडचणींमुळे नागरिक पूर्णपणे त्रासून गेले होते. नागरिकांना वारंवार होणारी गैरसोय लक्षात घेऊन माधवी जोशी यांनी स्वतः जातीने या समस्येत लक्ष देऊन निराकरण केले आणि सोलर पॅनेल स्ट्रीट लाईट बसविण्यात आल्या. या स्ट्रीट लाईटचे उद्घाटन माधवी जोशी आणि उद्योजक नरेश जोशी यांच्या शुभ हस्ते करण्यात आले.

या वेळी रायगड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष सुरेश टोकरे, तानाजी टोकरे आदी उपस्थित होते.

सोलर पॅनेल स्ट्रीट लाईट लावण्याचा मार्ग कर्जत नेरळ रोडपासून ते आंबिवली गाव, स्मशानभूमी आणि संपूर्ण मंदिर परिसर असा आहे. या उद्घाटन सोहळ्यास कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सायबर सुरक्षेसाठी महावितरणची प्रतिज्ञा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रीय सायबर सुरक्षा महिन्यांतर्गत सायबर सुरक्षा जागृती अभियानानिमित्त महापारेषण कंपनीचे प्रणाली विश्लेषक (माहिती तंत्रज्ञान) अतुल वारजुरकर यांनी प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र, पडघे येथे एक दिवसाचे सायबर सुरक्षा व जागरूकता प्रशिक्षण वर्ग घेतला.

या वेळी +/- ५०० के.व्ही. उदादिधा पडघे मंडळाचे अधीक्षक अभियंता राम कोल्हे, कार्यकारी अभियंता दीपक पाटील, सैय्यद अहमद तसेच श्रशरद माळी यांच्यासह विविध अधिकारी उपस्थित होते तसेच या प्रशिक्षणादरम्यान सर्व उपस्थित अधिकारी वर्गाने सायबर सुरक्षेसाठी प्रतिज्ञा घेतली.

## फडके विद्यालयात उद्यम लक्ष्मी उपक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल येथील महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके विद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त उद्यम लक्ष्मी या उपक्रमाचे उद्घाटन पनवेल महापालिकेच्या माजी नगरसेविका राजश्री वावेकर आणि विद्यालयाची माजी विद्यार्थिनी स्वराली घांग्रेकर-कर्वे यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. ३) करण्यात आले.



विद्यालयातील उद्योजक पालक आणि पनवेल परिसरातील अनेक लघुउद्योजकांच्या व्यवसायाला चालना देण्यासाठी तसेच बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी विद्यालयाच्या सभागृहात हा उपक्रम आयोजित केला आहे. या उपक्रमाचे यंदाचे पाचवे वर्ष आहे. विद्यार्थ्यांच्या लेखन, वाचन कौशल्यांचा विकास करण्यासाठी गेली ११ वर्षे प्रकाशित होणाऱ्या शिक्षणविवेक मासिकाच्या दिवाळी अंकाचे प्रकाशन माजी नगरसेविका राजश्री वावेकर आणि स्वराली घांग्रेकर-कर्वे यांच्या हस्ते करण्यात आले.

हिंदी राष्ट्रभाषेच्या अभ्यासाबाबत विद्यार्थ्यांमध्ये गोडी निर्माण होण्यासाठी घेण्यात आलेल्या अखिल भारतीय राष्ट्रभाषा विकास समिती मार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेत राष्ट्रीय भाषारत्न पुरस्कार प्राप्त अदिती हजारे आणि सृष्टी महाडिक या विद्यार्थिनींना सन्मानित करण्यात आले.

या विद्यार्थिनींना मार्गदर्शन करणाऱ्या विद्यालयातील हिंदी प्रमुख अश्विनी इनामदार, सहाय्यक शिक्षिका प्रीती धोपाटे यांचेही प्रमाणपत्र देऊन कौतुक करण्यात आले. उद्यम लक्ष्मी उपक्रमात सुगंधी तेल, उटणे, साबण, रंगरांगोळी, पणत्या, आकाश कंदिल, दीपमाळा, उदबत्त्या, तयार फराळाचे पदार्थ यांसह चॉकलेट, ड्रायफ्रुट, साड्या, ड्रेस, वेस्टर्न कपडे, नॅपकिन बुके, पर्सेस, सरबत, सौंदर्य प्रसाधने, पारंपरिक आणि वेस्टर्न दागिने, सोलापूरी चादरी, हर्बल उत्पादने, मसाले अशा अनेक वस्तू एकाच ठिकाणी रास्त दरात उलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

या उपक्रमाला नागरिकांनी भेट देण्याचे आवाहन विद्यालयाने केले आहे.या वेळी व्यासपीठावर माध्यमिक विभाग मराठी माध्यमाच्या मुख्याध्यापिका समिता सोमण, प्राथमिक विभाग मराठी माध्यमाच्या मुख्याध्यापिका निशा देवरे, माध्यमिक विभाग इंग्रजी माध्यमाच्या मुख्याध्यापिका मनिषा महाजन, पूर्वप्राथमिक विभाग मराठी माध्यमाच्या मुख्याध्यापिका नमिता जोशी उपस्थित होत्या.

## गोशाळेसह गरजूंना मदतीचा हात; जय माता दि ग्रुप महिला मंडळाचा उपक्रम

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील जय माता दि ग्रुप महिला मंडळाच्या माध्यमातून गेल्या आठ वर्षांपासून २५ ते ३० महिला एकत्रित येऊन विविध ठिकाणी भजनाचे कार्यक्रम सादर करतात व तेथे मिळणारे मानधन हे स्वतःकडे न ठेवता ते गोशाळेसह गरजूंना आवश्यक असलेल्या मदतीसाठी खर्च करत असल्याने





या महिला मंडळाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

मधू परमार, मंजू कलोर, यशोदा कुमावत, निमा वैष्णव व निशा वैष्णव या प्रमुख भगिनींसह इतर २५ ते ३० महिला एकत्रित येऊन आपली कौटुंबिक जबाबदारी पार पाडत मिळणाऱ्या वेळामध्ये त्या विविध सण, उत्सव, धार्मिक कार्यक्रमानिमित्त विविध मंदिर, नवरात्र उत्सव किंवा घरी जाऊन त्याचप्रमाणे श्रावणात भजने सादर करतात व त्यांना मिळणारे मानधन हे जमा करून ते पैसे गोर गरीब व गरजूंना त्याचप्रमाणे गो शाळेला मदतीचा हात देत सामाजिक बांधिलकी जपतात यंदाच्या वर्षी त्यांनी सलग नऊ दिवस नवरात्री हिंदू सार्वजनिक मंडळ येथे भजनाचे कार्यक्रम सादर केले.

याचप्रमाने शहरातील गावदेवी मंदिर, दुर्गामाता मंदिर, करंजाड्यातील शिवमंदिर आदी ठिकाणी त्याच्या भजनाचे कार्यक्रम नियमित सादर होत असतात. त्याच्या या उपक्रमाचे समाजासह सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

### भाजपचे ज्येष्ठ आमदार गोवर्धन शर्मा यांचे निधन

**अकोला :** अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघातून सहावेळा निवडून आलेले भाजप आमदार गोवर्धन शर्मा यांचे शुक्रवारी (दि. ३) रात्री निधन झाले. १ जानेवारी १९४९ रोजी यवतमाळ जिल्ह्यातील पुसद येथे जन्मलेले शर्मा हे अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघातून सर्वप्रथम १९९५मध्ये निवडून आले होते. २०१९च्या निवडणुकीत ते विधानसभेमध्ये निवडून आले होते. श्री रामनवमी शोभायात्रा समितीच्या माध्यमातून सातत्याने मदतीचा हात देणारे पश्चिम विदर्भातील एकमेव नेते होते. अन्नपूर्णा माता मंदिराजवळ त्यांच्या पार्थिवावर शनिवारी अंतिम संस्कार करण्यात येणार आहेत. गोवर्धन शर्मा यांच्या निधनाबद्दल विविध स्तरातून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली व्यक्त करण्यात येत आहे.

पान १ वरुन

### जनता भाजपच्या पाठिशी –आमदार प्रशांत ठाकूर

प्रभाग क्रमांक २मधून शांताराम चौधरी, प्रलय भोपी, जयश्री चौधरी प्रभाग क्रमांक ३मधून ललिता चौधरी, राणी सिनारे, प्रभाग क्रमांक ४मधून रमेश चौधरी, अमित पालकर, लता हिलम उभे आहेत. या उमेदवारांच्या प्रचारार्थ या सभेचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, तालका उपाध्यक्ष संजय पाटील, माजी पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, रमेश पाटील, रामदास शेळके, गणूबुवा भोपी, कृष्णा पाटील, भाऊबुवा सिनारे, नाना पाटील, वसंत पाटील, सत्यवान पाटील, हरीश माळी, शांताराम चौधरी, नारायण चौधरी, केशव पालकर, विठ्ठल पाटील, विष्णू वाघमारे, विलास भोपी, राजेश भोपी, भगवान भोपी, रामचंद्र भोपी, सुनील शेळके, विठ्ठल शेळके, गणेश उसाटकर, शत्रुघ्न उसाटकर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निजामपूर विभागात शिवसेनेचा प्रचार

**माणगाव : प्रतिनिधी**

आमदार भरत गोगावले यांनी निजामपूर विभागात मोठ्या प्रमाणात विविध विकासाची कामे केली आहेत. शिवाय गोरगरीब जनतेच्या सुखदुःखात ते धावून जात असल्याने त्यांच्या निजामपूर विभागातील ५ नोव्हेंबर रोजी होऊ घातलेल्या सहा ग्रामपंचायतींच्या निवडणुकांत शिवसेना पाच ग्रामपंचायतींवर विजय मिळवून मोठे यश संपादन करेल असा विश्वास विभागातील शिवसेनेचे नेते राजाभाऊ रणपिसे यांनी शुक्रवार (दि. ३) माणगाव येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत बोलताना व्यक्त केला.

राजाभाऊ रणपिसे पुढे म्हणाले की, निजामपूर जिल्हा परिषद गणात कडापे, जिते, भाले, शिरसाट, गंगावली, पळसगाव बुद्रुक या सहा ग्रामपंचायतींच्या निवडणुका जाहीर झाल्या असून त्यासाठी येत्या ५ नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे.

या सहा ग्रामपंचातींपैकी भाले ग्रामपंचायत वगळून उर्वरित पाच ग्रामपंचायतींवर आ. भरत गोगावले यांनी केलेल्या विकासकामांमुळे व त्यांची असणारी सर्वसामान्य माणसांची जवळीक तसेच त्यांनी आदिवासी बांधवांबरोबरच, गोरगरीब सर्वसामान्य जनतेला केलेली मदत, सर्वांच्या सुख-दुःखात ते समरस होत असल्याने त्यांच्या आशीर्वादाने विभागातील पाच ग्रामपंचायतींवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला आमदार गोगावले यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून १०० टक्के यश मिळेल.

निजामपूर विभाग हा शिवसेना शिंदे गटाला मानणारा असून उबाठाने कोणताही विकास या विभागात केलेला नसल्याने उबाठाला या विभागात मत मागण्याचा अधिकार नाही. सर्वस्वी विकास हा आमदार भरत गोगावले व खासदार सुनील तटकरे यांनी केला आहे. उद्धव गटाने एकही रुपयाचा विकासकाम निजामपूर गटात केला नसून त्यांना मतदार त्यांची जागा दाखवून देतील, असे मला विश्वास वाटत असल्याचे रणपिसे यांनी सांगितले.

## १८ वर्षांवरील नागरिकांसाठी प्रिकॉशन डोस

**नवी मुंबई : बातमीदार**

राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार कोविड लसीकरण कार्यक्रमांतर्गत नाकावाटे घ्यावयाचा इन्कोव्हॅक लसीचा समवेश करण्यात आला आहे. सदर लसीकरण एप्रिल २०२३पासून सुरु करण्यात आले होते, परंतु इन्कोव्हॅक लस ही ६० वर्षांवरील नागरिक हे सहव्याधी असल्याने ते अतिजोखमीचे असल्यामुळे प्रथमतः प्रिकॉशन डोस म्हणून सुरू करण्यात आली होती.

तथापि सद्यस्थितीत सर्व वयोगटातील नागरिकांकडून प्रिकॉशन डोसबाबत मागणी असल्याने १८ वर्षावरील सर्व नागरिकांना इन्कोव्हॅक लस देण्याबाबत सूचना प्राप्त झालेल्या आहेत. त्यानुसार १ नोव्हेंबर २०२३ पासून १८ वर्षांवरील नागरिकांना लसीकरणास सुरुवात करण्यात आलेली आहे.

नाकावाटे दिली जाणारी ही पहिलीच कोरोना प्रतिबंधक लस आहे. या लसीमुळे पेशींच्या रोगप्रतिकार क्षमतेत वाढ होणार असून थेट स्नायूमध्ये इंजेक्शन न देताच ही लस दिली जात असल्याने सुरक्षा देणारी आहे.

ही लस प्रिकॉशन डोस म्हणून दिली जात असून कोविशिल्ड किंवा कोव्हॅक्सिनची दुसरी मात्रा घेतल्यानंतर सहा महिने पूर्ण झालेले लाभार्थी हे प्रिकॉशन डोसकरिता पात्र असतात. ही लस नवी मुंबई महानगरपालिकेची वाशी, नेरुळ व ऐरोली येथील सार्वजनिक रुग्णालयात सकाळी ९ ते संध्याकाळी ५ यावेळेत उपलब्ध असणार आहे. हा डोस घेण्यासाठी दुसरा डोस घेतल्याचा पुरावा सोबत असणे आवश्यक आहे.

लसीकरणासाठी पात्र नवी मुंबईकरांनी इन्कोव्हॅक लसीचा प्रिकॉशन डोस घ्यावा व कोविड आजारापासून संरक्षित व्हावे असे आवाहन नमुंमपा आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# जासईत भाजपची प्रचार सभा

- विजय आपलाच होणार -आमदार प्रशांत ठाकूर
- शेकापमुळे विकास झाला नाही -आमदार महेश बालदी



(छाया : संकेत भोईर)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

येत्या ५ तारखेला मतदानाच्या रुपाने आणि ६तारखेला होणाऱ्या मतमोजणीच्या रूपाने विजय आपलाच होणार आहे, असा विश्वास भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी जासई येथे आयोजित केलेल्या प्रचार सभेत व्यक्त केला. तर आमदार महेश बालदी यांनीही शेकापमुळे या गावाचा विकास झाला नाही. त्यामुळे २१व्या शतकातील युगातील जासई करण्यासाठी भाजपच्या बळीराम तुकाराम घरत यांना विजयी करा, असे आवाहन मतदारांना केले.

पनवेल तालुक्यात ग्रामपंचायत निवडणुकीची धामधूम सर्वत्र सुरू आहे. याअंतर्गत जासई ग्रुप ग्रामपंचायतीमधील भाजप उमेदवारांच्या प्रचारार्थ आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांच्या उपस्थितीत गुरुवारी (दि. २) प्रचार सभा आयोजित करण्यात आली होती. या निवडणुकीमध्ये थेट सरपंच पदासाठी बळीराम तुकाराम घरत तर सदस्यपदासाठी प्रभाग क्रमांक १ मधून तेजस पाटील, संदेश घरत प्रभाग क्रमांक २ मधून आनंद म्हात्रे, प्रतीक्षा म्हात्रे, भूषण म्हात्रे, प्रभाग क्रमांक ३ मधून कुणाल म्हात्रे, ज्योती मढवी, पौर्णिमा कांबळे, प्रभाग क्रमांक ४ मधून आदित्य घरत, दीपाली घरत, सीमा घरत, प्रभाग क्रमांक ५ मधून दिनेश येरकर, जयश्री घरत, स्वप्नाली दामले, प्रभाग क्रमांक ६मधून दयानंद म्हात्रे, सिंधूबाई पवार, सुजाता पाटील हे उभे आहेत.

या उमेदवारांच्या प्रचारार्थ या सभेचे आयोजन करण्यात आले असून या सभेला मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.





यावेळी धनाजी ठाकूर, सतीश घरत, सुधीर घरत, भाजपचे उरण तालुकाध्यक्ष रवी भोईर, चंद्रकांत घरत, गोपीनाथ म्हात्रे, सुनील घरत यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आदी उपस्थित होते.

## ग्रामपंचायत निवडणुक रणधुमाळी

# न्हावे-न्हावेखाडी उमेदवारांच्या प्रचारार्थ प्रचार रॅली



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यामध्ये ग्रामपंचायत निवडणुकांची धामधुम सुरू आहे. त्या अंतर्गत न्हावे ग्रामपंचायतीमधील प्रचार अंतिम टप्प्यात आला आहे. त्यानुसार भारतीय जनता पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि काँग्रेसप्रणित उत्कर्ष ग्रामविकास मंडळ न्हावे-न्हावेखाडीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ शुक्रवारी (दि. ३) प्रचार रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

या निवडणुकीमध्ये थेट सरपंचपदासाठी विरेंद्र पाटील, प्रभाग क्रमांक ४मधून सागर ठाकूर, नरेश मोकल, ललिता ठाकूर उभे आहेत. यांच्या प्रचारासाठी न्हावे परिसरात शुक्रवारी प्रचार रॅली काढण्यात आली. या वेळी मतदारांपर्यंत पोहचून उत्कर्ष ग्रामविकास मंडळ न्हावे-न्हावेखाडीच्या उमेदवारांच्या उमेदवारांना



प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन करण्यात आले.

या वेळी भाजप महिला मोर्चा तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत, माजी नगरसेविका दर्शना भोईर, वर्षा नाईक, प्रतिभा भोईर, कल्पना ठाकूर, म्हसेश्वर मंदिर कमिटी अध्यक्ष सी. एल. ठाकूर, सागर ठाकूर, नरेश मोकल, ललिता ठाकूर, राम मोकल, अरुण ठाकूर, प्रकाश कडू, सुजीत मोकल, रतन ठाकूर, महिला कार्यकर्त्या आणि पदाधिकारी न्हावेखाडीचे ग्रामस्थ उपस्थित होते.

मोठापाडा, उत्तरपाडा, मधला येथे रॅली फिरविण्यात आली असून सभेमध्ये भाजप महिला मोर्चा तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत, माजी नगरसेविका दर्शना भोईर, प्रकाश कडू यांची भाषणे झाली. यामध्ये त्यांनी उत्कर्ष ग्रामविकास मंडळ न्हावे-न्हावेखाडीच्या उमेदवारांना विजयी करण्याचे ग्रामस्थांना आवाहन केले.

# बनावट व्हिसा वापरून वास्तव्य करणाऱ्या विदेशी महिलेवर कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

बनावट व्हिसा वापरून वास्तव्य करणाऱ्या विदेशी महिलेवर पोलिसांनी ऑगस्ट महिन्यात कारवाई केली होती. न्यायालयाने तिला सहा महिन्यांची शिक्षा व एक हजार रुपयांचा दंड सुनावला आहे. तर कारावास भोगल्यानंतर तिला युगांडा या तिच्या मूळ देशात हद्दपार केले जाणार आहे.

तळोजा परिसरात राहणाऱ्या विदेशी महिलेकडे भारतात वास्तव्याची बनावट कागदपत्रे असल्याचे विशेष शाखेच्या सतर्कतेमुळे समोर आले होते. त्यानुसार तळोजाचे वरिष्ठ निरीक्षक सतीश गोरे, विशेष शाखेचे निरीक्षक विशाल माने यांच्या पथकाने ऑगस्ट महिन्यात या महिलेवर कारवाई केली होती. मूळच्या युगांडाच्या राहणाऱ्या या महिलेने दुसऱ्या व्यक्तीच्या व्हिसाच्या प्रतीत स्वतःची माहिती भरून तो व्हिसा मूळ




असल्याचे भासवून नवी मुंबई पोलिसांकडे जमा केला होता.

**एक हजाराचा दंडही!**

*तिची चलाखी विशेष शाखा पोलिसांना लक्षात येताच तिला अटक करण्यात आली असून तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. याप्रकरणी पनवेल न्यायालयात तिच्यावर दोषारोपपत्र सादर करण्यात आले होते. नुकतेच त्यावर सुनावणी झाली असता सरकारी वकील जयश्री कुलकर्णी यांनी मांडलेल्या सबळ पुराव्याआधारे न्यायाधीशांनी या विदेशी महिलेला सहा महिने कारावास व एक हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा सुनावली आहे.*

# रावसाहेब खरात यांचे अभिनंदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रावसाहेब खरात यांची भाजप अनुसूचित जाती मोर्चा पनवेल शहर अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी अभिनंदन केले आहे.

भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर उत्तर, रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल शहर मंडल अध्यक्ष अनिल भगत यांच्या सुचनेवरून भाजप अनुसूचित जाती मोर्चा पनवेल शहर अध्यक्षपदी रावसाहेब खरात यांची नियुक्ती झाली आहे. त्याबद्दल लोकमान्य नगर रेल्वे स्टेशन रोड येथे तथागत मित्र मंडळांने नवीन भाजप अनुसूचित जाती मोर्चा पनवेल शहर अध्यक्ष रावसाहेब खरात यांचे अभिनंदन करण्यात आले तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

या वेळी उपस्थित तथागत मित्र मंडळांचे कार्यकर्ते आणि भाजप कार्यकर्ते प्रकाश बोरुडे, किरण वाहुळकर, सर्जेराव साळवे, विजय झिरे, उमेश कांबळे, योगेश खरात, गणेश जाधव, दर्शन वाहुळकर, हरिभाऊ घुले, सागर जाधव, अजय जाधव, अजय सकपाळे, नैतिक कांबळे, अजय पवार, आकाश जाधव, स्वप्नील वाहुळकर, जितेंद्र राजभर, सनी साळवे, अनिकेत खरात आदी कार्यकर्ते उपस्थित होते.





**पनवेल : भाजप कार्यकर्ते महेंद्र ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप खारघर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**



**पनवेल : भाजप कार्यकर्त्या दिपाली ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त भाजप महिला मोर्चा तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत, माजी नगरसेविका दर्शना भोईर, वर्षा नाईक, नंदा पाटील, अरूणा पाटील, आशा तळोजकर आदींनी शुभेच्छा दिल्या.**

# नॅक मुल्यांकनासाठी जिल्ह्यातील महाविद्यालयांना जागरूकता आणि मार्गदर्शन

## सीकेटी महाविद्यालयात एक दिवसीय कार्यशाळा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज (स्वायत्त) येथे नॅक मुल्यांकनासाठी रायगड जिल्ह्यातील मुल्यांकन नसलेल्या महाविद्यालयांना नॅक बद्दल जागरूकता आणि मार्गदर्शन या विषयावर अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, परीस्पर्श योजना व उच्च शिक्षण कोकण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने, राष्ट्रीय उच्चतर शिक्षण अभियाना अंतर्गत एक दिवसीय कार्यशाळेचे शुक्रवारी (दि. ३) सकाळी १० वाजता आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेच्या उद्घाटनावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उच्च शिक्षण कोकण विभागाचे प्रादेशिक सहसंचालक डॉ. केशव तुपे आणि संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे उपस्थित होते. तसेच छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा (स्वायत्त) येथील अर्थशास्त्र विभाग प्रमुख व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रो. डॉ. अनिलकुमार वावरे, कर्मवीर भाऊराव पाटील सातारा विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव व डी. जी. कॉलेज ऑफ कॉमर्स, सातारा येथील सहयोगी प्राध्यापक डॉ. विजय कुंभार, पिल्लई शिक्षण आणि संशोधन महाविद्यालायाचे प्राचार्य डॉ. सॅली एनोस, पिल्लई अभियांत्रिकी महाविद्यालायाचे प्राचार्य डॉ. संदीप जोशी, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बी. डी. आघाव इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

कार्यशाळेची सुरुवात अतिथींच्या स्वागताने झाली. यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के.पाटील यांनी महाविद्यालयातील कीर्तीचा मागोवा घेत, महाविद्यालयाद्वारे संचालित विविध अभ्यासक्रमांचा आढावा घेतला व राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावणीच्या दृष्टीने महाविद्यालयाने सुरू केलेल्या सुविधांची माहिती दिली. यानंतर डॉ. बी. डी. आघाव यांनी कार्यशाळेचे प्रास्ताविक मांडले.

प्रथम सत्रात कला शाखेचे प्रमुख प्रो. डॉ. बी. एस. पाटील यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली व आभार प्रदर्शन इंग्रजी विभागाचे एस. एन. परकाळे यांनी केले. या सत्रात डॉ. एस. टी. गडदे यांनी उच्च शिक्षण संस्थेत नॅक मुल्यांकनाचे महत्त्व पटवून दिले.

द्वितीय सत्रात सूक्ष्मजीव शास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. एन. सी. वडनेरे यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली व आभार प्रदर्शन इंग्रजी विभागाचे प्रमुख डॉ आर. व्ही. येवले यांनी केले. या सत्रात डॉ. अनिलकुमार वावरे यांनी नॅक मान्यतेचे फायदे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाची रचना, नॅक मूल्यांकनामध्ये अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाची भूमिका त्याचबरोबर नॅक मुल्यांकनाची प्रक्रिया व त्यांच्या महाविद्यालयात घेण्यात आलेल्या सर्वोत्तम पद्धती या विषयांवर मार्गदर्शन केले.

तृतीय सत्रात विज्ञान शाखेच्या प्रमुख डॉ. जे. एस. ठाकूर यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली व आभार प्रदर्शन लेखा आणि वित्त विभागाचे प्रमुख डॉ. एन. ई. कोळी यांनी केले. या सत्रात डॉ. विजय कुंभार यांनी आपल्या व्याख्यानात नॅक मूल्यांकनामध्ये संशोधनाचे महत्त्व पटवून देताना संशोधनाच्या गुणांच्या विश्लेषणाचे स्वरूप सर्वांच्या निदर्शनास आणून दिले.

चौथ्या सत्रात इंग्रजी विभागाचे एस. एन. परकाळे यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली व आभार ग्रंथपाल आर. ए. नवघरे यांनी मानले. या सत्रात डॉ. संदीप जोशी यांनी आपल्या व्याख्यानात परीस्पर्श योजनेची माहिती दिली तसेच त्यांनी मेंटोर मेंटी योजनेचे नॅक मूल्यांकनासाठी असलेले महत्व या विषयावर मार्गदर्शन केले आणि पुढील सत्रात सर्व मान्यवरांनी नॅक मूल्यांकन या विषयावर चर्चा केली.

कार्यशाळेचे सूत्रसंचालन इंग्रजी विभागाचे प्रमुख डॉ आर. व्ही. येवले आणि आभार प्रदर्शन कला शाखेचे प्रमुख प्रो. डॉ. बी. एस. पाटील यांनी केले.

परिसंवाद यशस्वीरित्या केल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर व संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.

## संपादकीय

# अखेर ग्रहण सुटले!

मराठा आरक्षणप्रश्नी उद्भवलेल्या उग्र आंदोलनामुळे गेला आठवडाभर महाराष्ट्रातील वातावरण अस्थिर झाले होते. मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांनी गुरुवारी आपले उपोषण सोडल्यानंतर वातावरण सुरळीत होण्यास आता मदत होईल असे वाटते.

**मराठा आरक्षणाचा प्रश्न गेली काही वर्षे अत्यंत जिव्हाळ्याचा बनला आहे. या आरक्षणासाठी प्रामाणिक धडपड करणारे सरकार सत्तेवर असूनही हा प्रश्न अद्याप धसास लागू शकला नाही कारण हा प्रश्न सुटण्यासाठीचा मार्ग संसदेतून अथवा न्यायालयातूनच जातो, हे सत्य नाकारता येणार नाही. गेले साडेतीन दशकांहून अधिक काळापासून मराठा समाजाला आरक्षण मिळावे ही मागणी होत होती. मधल्या काळात मराठा समाजातर्फे तब्बल ५८ विशाल मोर्चे काढण्यात आले. अतिशय सुसंस्कृतपणे, शांततेत हे मोर्चे पार पडले. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही त्या मोर्चांना दिलेला सकारात्मक प्रतिसाद स्तुत्य होता. जरांगे-पाटील यांनी मराठा आंदोलनाची मागणी लावून धरताना जो पवित्रा घेतला, त्यामुळे गेल्या दोन्ही वेळेला जाळपोळ, दगडफेकीच्या घटना घडल्या. यामुळे मराठा आंदोलनाच्या आजवरच्या प्रतिमेला थोडेसे गालबोट लागले हे निश्चित. विशेष म्हणजे सत्तेतील सर्वच नेत्यांचा या आंदोलनाला संपूर्ण पाठिंबा असताना हे प्रकार घडले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुढाकार घेऊन ज्या पध्दतीने मराठा आंदोलनाला प्रतिसाद दिला, तो वाखाणण्याजोगा आहे. 'शरीरात रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत मराठा आरक्षणासाठी झटेन' अशी प्रतिज्ञाच त्यांनी आझाद मैदानावर झालेल्या दसरा मेळाव्यात केली. मराठा आरक्षणाचा प्रश्न सहजी सुटणारा नाही. इतिहासातील कुणबी नोंदींची तपासणी करून अहवाल सादर करण्यासाठी त्यांनी निवृत्त न्यायाधीश संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित केली. या समितीनेही अहोरात्र काम करुन मराठा आरक्षण सर्वोच्च न्यायालयात टिकेल असे पुरावे गोळा केले. सर्वोच्च न्यायालयात यासंदर्भात दुरुस्ती याचिका दाखल करण्यात आली असून आता सबळ युक्तिवाद करण्याची जबाबदारी राज्य सरकार आणि वकिलांची राहील. त्यासाठी काही मुदतीची आवश्यकता होती. जरांगे-पाटील यांना भेटून सरकारी शिष्टमंडळाने ही वस्तुस्थिती कानावर घातल्यानंतर त्यांनी उपोषण मागे घेण्याचा निर्णय घेतला हे चांगलेच झाले. आंदोलनाच्या दरम्यान अनेक ठिकाणी हिंसक प्रकार घडले. काही नेत्यांना गावबंदी करण्यात आली, तर काही नेत्यांची घरे जाळण्याचा प्रयत्न झाला. अशा प्रकारांचे समर्थन मराठा आंदोलकही कधी करणार नाहीत. ज्यांनी लाखालाखांचे ५८ मोर्चे यशस्वीपणे काढून दाखवले, त्या समाजाला आपल्या मागण्यांसाठी हिंसक मार्ग अवलंबावा असे वाटणे शक्यच नाही. असले प्रकार बरेचदा आंदोलनाचा गैरफायदा घेऊ पाहणारे समाजकंटक करतात. त्यांच्या कृत्यांची सखोल चौकशी करून त्यांना कायद्यासमोर उभे करण्याचा निर्धार गृहखात्याने केला आहे. तपासाअंती, या हिंसाचारामागे कोण आपला राजकीय डाव साधू पाहात आहे, ते उघड होईलच. हिंसक आंदोलनाची झळ एसटी महामंडळाच्या बसगाड्यांनाही बसली. त्यामुळे बस वाहतुकीवरही परिणाम झाला. सध्याचे दिवस मुलांच्या परीक्षांचे आहेत. दिवाळीसारखा महत्त्वाचा सणही उंबरठ्यावर आला आहे. अशा वेळी बसवाहतुक खोळंबण्याने अपरिमित नुकसान होत होते. जरांगे-पाटील यांनी सबुरीचा निर्णय घेतल्याने आता सर्वांनीच सुटकेचा निश्वास टाकला असेल. मराठा आरक्षणाचे आंदोलन तूर्त थांबले असले तरी प्रश्न सुटलेला नाही. मुख्यमंत्री शिंदे यांच्या नेतृत्त्वाखालीच तो सुटू शकेल याबद्दल शंका नाही.**

# अंमली पदार्थांविषयी जनजागृती आवश्यक

१९९३ च्या मुंबई बॉम्बस्फोटाचा बळी म्हणून २५० निरपराध नागरिक मृत्युमुखी पडले तर ८००हून अधिक माणसे गंभीर जखमी झाल्याची सल अजुनही अस्वस्थ करते. तसेच १९९२ मध्ये श्रीवर्धन तालुक्यातील शेखाडी बंदरातुन स्थानिक मच्छिमारांच्या अज्ञानाचा फायदा घेत १३ पोलीस ठाण्यांना गुंगारा देत आरडीएक्स थेट मुंबईत आणण्यात देशविघातक शक्ती यशस्वी ठरली या सर्व घटना देशाच्या सुरक्षिततेला आव्हान देणाऱ्या ठरतात.



गेल्या महिन्याभरापासून कोकण किनारपट्टीवर अमली पदार्थ वाहून येण्याचे सत्र सुरू होते. याचे दुष्परिणाम दिसून येण्यास आता सुरुवात झाली आहे. मुरूड येथे वाहून आलेल्या चरसचे सेवन करताना एका तरुण-तरुणीला पोलिसांनी अटक केली आहे. दोघांनाही न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे. पोलीस कस्टडी या कालावधीत या दोघांनी समुद्र किनारी जे चरस चे पॉकेट मिळाले त्याचे आम्ही सेवन करीत असल्याची कबुली दिली आहे. अशी पॉकेट अनेक सागरी किनारी मिळून आली आहेत. काही पॉकेट पोलिसांना आढळून आली तर काही इतर व्यक्तींना मिळून काहींनी व्यवसायसुद्धा करून रग्गड पैसेसुद्धा कमवले असतील यात तरुणाईचे नुकसान होण्याची दाट शक्यता वर्तवण्यात येत आहे, पण ही घटना पुढील धोक्याची चाहूल आहे. त्यामुळे या प्रकरणाला गांभीर्याने घेऊन, असे प्रकार टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे गरजेचे आहे.

रायगड जिल्ह्यात गेल्या महिन्याभरात २१९ किलो वजनाची १८५ चरसची पाकिटे जिल्ह्यातील विविध समुद्रकिनाऱ्यांवर वाहून आली होती. ज्याची बाजारातील किंमत साडेआठ कोटींहून अधिक आहे. याप्रकरणी श्रीवर्धन आणि अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असला तरी, ही पाकिटे कुठून आणि कशी आली, कोणी टाकली, हे अद्यापही स्पष्ट होऊ शकलेल नाही. मुरूड पोलीस ठाण्यात आणून त्यांच्यावर १५८/२०२३एन.डी.एस ॲक्ट कलम (८)क, २७प्रमाणे अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**खबरबात**
**संजय करडे**

पाकिस्तान प्रीमियम क्वालिटी राइस असा उल्लेख असलेली आणि त्यात चरस हा अमली पदार्थ असलेली ही पाकिटे किनारपट्टीवर कशी आली याचा शोध अद्यापही लागलेला नाही. रायगड व रत्नागिरी जिल्हयातील सागर किनारपट्टीवर २७ ऑगस्ट रोजी अफगाण देशाचे नाव असलेले अंमली पदार्थ आढळुन आल्याने सागरी सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. घटनांचे दुष्परीणाम दिसून येण्यास आता सुरुवात झाली आहे. मुरूड येथे एका तरुण व तरुणीला चरसचे सेवन करताना पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्यावर एनडीपीएस अंतर्गत कार्यवाही करण्यात आली आहे.


दारू, सिगारेट, मावा, गुटखा, तंबाखू याचे दुष्परिणाम जगजाहीर आहेतच. ड्रग्स व इतर व्यसनांचे परिणाम आणखी गंभीर आहेत. अंमली पदार्थांचे सेवन केल्याने शरीराची अन्न ग्रहण करण्याची इच्छाच नाहीशी होते. मानसिक आजार जडतात नजर कमी होते स्मृतिभ्रंश, मधुमेह जडतो. मेंदूच्या कार्यावर व लैगिंक जीवनावरही परिणाम होतो.

समुद्रातून वाहून आलेली चरसची पाकिटे कोठून आली याबाबत पोलिसांनासुद्धा याचे मूळ शोधणे अवघड झाल्याने ते आपली कोणतीही भूमिका जाहीर करीत नाहीत. किमान याबातच तपास केंद्रीय तपास यंत्रणेकडे सुपूर्द करून याबतचे गूढ उकलण्याचा प्रयत्न होणे खूप गरजेचे होते, परंतु ही पाकिटे कशी आली याबाबत कोणतेही सत्य बाहेर येत नसल्याने लोक मात्र संभ्रमात आहेत. समुद्रात वाहून आलेली पाकिटे सर्वच पोलिसांना सापडली असे नाही यातील काही पाकिटे कोणाच्या हाताला लागून कोणी याचा व्यवसाय केला हेसुद्धा शोधणे काळाची गरज आहे, परंतु ही पाकिटे तरुणाईला बिगडवू शकतात हे नुकत्याच घडलेल्या घटनेवरून स्पष्ट होत आहे. समुद्रातून वाहून आलेली चरसची पोकिटे यामागचे गूढ शोधून काढण्यात रायगडच्या पोलीस यंत्रणेला जमलेले नाही. त्यामुळे भविष्यात हे सत्य उघड होणे आवश्यक असताना गुलदस्त्यात राहिल्याने प्रश्न तसाच राहणार आहे. तपास यंत्रणा सक्षम असणे खूप आवश्यक असताना अश्या घडणाऱ्या घटना यंत्रणेची सक्षमता दर्शवत असतात. रायगडच्या समुद्र किनारी चरसची पॉकेट का आली कशी आली. हे शोधणे खूप आवश्यक असताना यामागचे सत्य समोर न आल्याने हा प्रश्न तसाच अनुत्तरित राहणार आहे. वर्ष सरले की याचासुद्धा विसर पडणार आहे. यासाठी सक्षम तपास यंत्रणा असणे खूप आवश्यक आहे.

# आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके

फडके हे भारतीय क्रांतिकारक होते. त्यांना भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील आद्यक्रांतिकारक किंवा सशस्त्र क्रांतीचे जनक मानले जाते. रायगड जिल्ह्यातील शिरढोण गावात जन्मलेल्या फडक्यांचे आजोबा नजीकच्या कर्नाळा किल्ल्याचे किल्लेदार होते. लहानपणीच फडक्यांना कुस्ती, घोडेस्वारी आणि तलवारबाजीचे प्रशिक्षण मिळाले.

माध्यमिक शिक्षण संपल्यावर ते पुण्याला आले व सदाशिव पेठेतील नरसिंह मंदिराजवळ राहून इंग्रज सरकारच्या सैन्य लेखा सेवेत भरती झाले. येथे असताना त्यांच्यावर महादेव गोविंद रानड्यांचा प्रभाव पडला व भारताच्या खालावलेल्या आर्थिक परिस्थितीचे कारण ब्रिटिश धोरणे होती असे त्यांच्या लक्षात आले. त्याचवेळी फडके हे क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवेंच्याही प्रभावात होते. साळव्यांनी ब्रिटिशांपासून स्वातंत्र्य मिळवण्याचे आणि मागासलेल्या जातींनाही या लढ्यात सामील करून घेणे महत्त्वाचे असल्याचे फडक्यांना पटवून दिले.



आपल्या अंथरुणाला खिळलेल्या मरणासन्न आईला भेटण्यासाठी फडक्यांनी रजा मागितली असता त्यांच्या इंग्रज अधिकाऱ्याने टाळाटाळ केली. फडके रजा मिळून घरी जाईपर्यंत त्यांच्या आईचा स्वर्गवास झालेला होता. संतप्त झालेल्या फडक्यांनी आपली सरकारी नोकरी सोडून दिली व त्यानंतर ब्रिटिश सरकारच्या धोरणांविरुद्ध जाहीर भाषणे देण्यास सुरुवात केली.

आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके लहानपणापासूनच तडफदार व्यक्तिमत्त्वाचे होते. शिक्षणात त्यांचे मन विशेष रमले नाही. वयाच्या दहाव्या वर्षी त्यांनी प्राथमिक शाळेत प्रवेश केला. हायस्कूल शिक्षणासाठी पुणे गाठून त्यांनी इंग्रजीचे शिक्षण घेतले. त्यांनी रेल्वेत लिपिकाची नोकरी केली. त्यानंतर १८६४ मध्ये लष्कराच्या वित्त विभागात दाखल झाले. या वेळी किरकोळ कारणावरून त्यांचे मतभेद झाले आणि त्यांनी नोकरी सोडून दिली.

ब्रिटिशांच्या दडपशाहीची आणि पारतंत्र्याची जाणीव त्यांच्या मनात जागृत झाली आणि त्यांनी ब्रिटिश सत्तेविरूद्ध बंड पुकारले. त्यांनी गावोगाव भटकत ब्रिटिशांविरुद्ध असंतोष निर्माण करत बंडाची पार्श्वभूमी तयार केली. गनिमी कावा ही शिवकाळातील युक्ती त्यांनी आपल्या संघर्षासाठी उपयोगात आणली. या माध्यमातून त्यांनी ब्रिटिशांविरुद्ध बंड पुकारले.

**(साभार : इंटरनेट)**

## बदलते तंत्रज्ञान

# भारतात लॉन्च झाला 'लावा'चा 'हा' स्मार्टफोन

लावा ही एक लोकप्रिय भारतीय मोबाइल उत्पादक मोबाइल कंपनी आहे. कंपनी आपल्या ग्राहकांसाठी कंपनी नवनवीन स्मार्टफोन्स लॉन्च करत असते. लावा कंपनीने




गुरुवारी भारतामध्ये आपला Blaze 2 5G हा स्मार्टफोन लॉन्च केला आहे. लावा ब्लेझ २ ५ जी हा मागील वर्षी लॉन्च करण्यात आलेल्या ब्लेझ ५ जी चे अपडेटेड मॉडेल आहे. हा फोन कंपनीने ग्लास बॅकसह तीन रंगांमध्ये लॉन्च केला आहे. लावा ब्लेझ २ ५जी या नवीन स्मार्टफोनचे फीचर्स, किंमत आणि कॅमेरा याबद्दल अधिक माहिती जाणून घेऊयात.

लावा ब्लेझ २ ५जी हा फोन अँड्रॉइड १३ वर चालतो. यामध्ये ड्युअल नॅनो सिमचा सपोर्ट देण्यात आला आहे. यामध्ये ६.६ इंचाचा HD प्लस डिस्प्ले मिळणार आहे. याचा रिफ्रेश रेट हा ९० कूइतका आहे. तसेच या फोनमध्ये ऑक्टा कोर मिडियाटेक डायमेन्शन ६०२० SoC चा सपोर्ट देण्यात आला आहे. या फोनमध्ये तुम्हाला ६ जीबी रॅम मिळणार आहे. व्हर्च्युअल रॅमच्या माध्यमातून १२ जीबी पर्यंत स्टोरेज वाहदवता येणार आहे. याबाबतचे वृत्त gadgets360ने दिले आहे.

लावा ब्लेझ २ ५जी मध्ये एलईडी फ्लॅशसह ड्युअल कॅमेरा युनिट मिळणार आहे. तसेच यामध्ये वापरकर्त्यांना ५० मेगापिक्सलचा प्राथमिक सेन्सर आणि ०.०८ मेगापिक्सलचा सेकंडरी कॅमेरा मिळणार आहे. सेल्फी व व्हिडीओ कॉलिंगसाठी यामध्ये स्क्रीन फ्लॅशसह ८ मेगापिक्सलचा कॅमेरा देण्यात आला आहे. यामध्ये १२८ जीबी स्टोरेज मिळणार असून ते स्टोरेज १ टीबी पर्यंत पर्यंत वाढवता येणार आहे.

कनेक्टिव्हिटीसाठी लावा ब्लेझ २ ५ जी मध्ये ५ जी, ४ जी, ब्लूटूथ, एफएम रेडिओ, वायफाय ८०२.११ , ओटीजी एक ३.५ मीमीचे ऑडिओ जॅक, आणि एक यूएसबी पोर्टचा समावेश आहे. तसेच सुरक्षिततेसाठी साइड माउंटेड फिंगरप्रिंट सेन्सर देण्यात आला आहे. तसेच यात फेस अनलॉकचे फिचर मिळते. तसेच लावा ब्लेझ २ ५जी मध्ये ५००० m-h क्षमतेची बॅटरी मिळते आणि त्याला १८थ चा चार्जिंग सपोर्ट देण्यात आला आहे.

लावा ब्लेझ २ ५जी भारतात ९,९९९ रुपयांमध्ये लॉन्च करण्यात आला आहे. हा फोन ग्लास ब्लॅक, ग्लास ब्ल्यू, ग्लास लव्हेंडर या रंगांमध्ये लॉन्च करण्यात आला आहे. याची विक्री ९ नोहेंबरपासून लावा इ स्टोअर आणि Amazon इंडियावर सुरू होणार आहे.

# भारतीय गणितज्ज्ञ शकुंतलादेवी

चालत्या बोलत्या गणिती यंत्र अशी शकुंतलादेवी यांची ओळख राहिली आहे. त्यांचा जन्म ४ नोव्हेंबर रोजी १९२९ रोजी बंगळुरूमध्ये झाला. त्यांच कुटुंब म्हणजे पारंपरिक कन्नड ब्राह्मण, पण शकुंतलादेवी यांचे वडील नव्या युगातले. त्यांनी आपल्या भिक्षुकीच्या पारंपरिक व्यवसायाला आणि मंदिरातील परंपरागत पुजारी होण्याला नकार देऊन सर्कसमधील आडवाटेवरची नोकरी धरली.



शकुंतलादेवीचे वडील सर्कसमध्ये काम करत होते. तीन वर्षांच्या शकुंतलाला पत्त्याचे खेळ शिकवताना तिच्या अफाट स्मरणशक्तीचे त्यांना ज्ञान झाले. त्यांनाच शकुंतलादेवीमधील झपाट्याने गुणाकार-भागाकार करण्याची शक्तीची पहिल्यांदा ओळख पटली. सर्कस सोडून ते शकुंतलाचेच रोडशो करू लागले. वयाच्या सहाव्या वर्षी शकुंतलाने म्हैसूर विद्यापीठात आपल्या अंकगणितीय कौशल्याचे प्रदर्शन केले. शकुंतलादेवी १९४४मध्ये लंडनला गेल्या. लंडनला गेल्यावर पुढे त्यांनी संपूर्ण जगामध्ये प्रवास केला आणि आपल्या बुद्धिमत्ता आणि गणितीय कौशल्याचे वेगवेगळे चमत्कार दाखवून त्यांनी संपूर्ण जगाला चक्रावून सोडले. १९७६ साली आपल्या अमेरिका दौऱ्यात त्यांनी संगणकापेक्षा अधिक वेगाने आकडेमोड पूर्ण करून त्याची उत्तरे परीक्षकांसमोर अचूक सादर केली.

**निमित्त**

इ.स. १९७७मध्ये डलास विद्यापीठात शकुंतलाचा मुकाबला तत्कालीन सर्वात जलद कॉम्प्यूटर 'युनिव्हॅक'शी झाला. तेथे शकुंतलादेवीने एका २०१ अंकी संख्येचे २३वे मूळ ५० सेकंदात काढले व फळ्यावर लिहिले. हे मूळ काढायला कॉम्प्युटरला ६२ सेकंद लागले. १८ जून १९८०मध्ये त्यांना ७६८६३६९७७४८७० आणि २४६५०९९७४५७७९ या दोन संख्या गुणाकारासाठी देण्यात आल्या. हे आकडे लंडनच्या इम्पीरियल कॉलेजच्या संगणक विभागाने निवडलेले होते.

शकुंतलादेवी यांनी या दोन आकड्यांचा अचूक गुणाकार करून दाखवत केवळ २८ सेकंदामध्ये १८९४७६६८१७७९९५४२६४६२७७३७३० हे उत्तर दिले. १३ आकडी दोन संख्यांचा गुणाकार त्यांनी फक्त २८ सेकंदात पूर्ण केला. त्यांच्या याच कामगिरीमुळे त्यांना ह्युमन कॉम्प्युटर म्हणून ओळखले जाऊ लागले आणि शकुंतलादेवी यांचे नाव गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्समध्ये विराजमान झाले. शकुंतलादेवी यांच्या अंगी एक अदभुत प्रतिभा होती की अख्ख्या भारतास त्याची दाखल घ्यावी लागली. गुगलने त्यांच्या पहिल्या जयंतनिमित्त डुडल बनवून त्यांना आदरांजली वाहिली होती. भारतात परतल्यावर १९८८मध्ये त्यांना अमेरिकेतून बर्कलेच्या कॅलिफोर्निया विद्यापीठामधील मानसशास्त्र विभागाचे विशेष आमंत्रण आले. या विभागातील प्रा. आर्थर जेनसन यांनी त्यांच्यावर संशोधन करण्यास सुरुवात केली. प्रा. आर्थर जेनसन यांनीदेखील त्यांच्यावर असंख्य प्रयोग केले.

कोणत्याही अवघड बहुअंकी संख्येच घनमूळ काढणे किवा कोणत्याही बहुअंकी संख्येचा सातवा किवा आठवा घात काढायला सांगण्याची खोटी की शकुंतलादेवी यांचे उत्तर हजर असायचे. २०१३ सालच्या एप्रिल महिन्यात वयाच्या ८३व्या वर्षी बंगळुरूमध्ये शकुंतलादेवी यांनी अखेरचा श्वास घेतला आणि हा जगप्रसिद्ध ह्युमन कॉम्प्युटर काळाच्या पडद्याआड झाला.

**(साभार : इंटरनेट)**

## क्लिक...क्लिक...!

(छाया : सुधीर नाझरे)





**केरळ : भारतातील केरळ आणि कर्नाटक राज्यातील एक लोकप्रिय धार्मिक विधी. तय्यममध्ये अनेक प्राचीन परंपरा, विधी आणि प्रथा यांचे दर्शन होते. केरळमधील पारंपरिक लोकनृत्य शैलीमध्ये तय्यम ही एक वैशिष्ट्यपूर्ण लोक नृत्यशैली आहे.**

## आरोग्य प्रहर

# उचकी का लागते आणि त्यावर उपाय काय?

आपल्या जवळच्या व्यक्तीनी किंवा मित्रांनी आठवण काढली की उचकी लागते असा आपल्या सर्वांचा लहानपणापासून समज आहे. उचकी बऱ्याचदा अचानक उद्भवते आणि त्वरित त्रासदायक होऊ शकते. जरी उचकी सामान्यत: काही मिनिटांत थांबते, परंतु बऱ्याच काळ असलेल्या उचकीपासून लवकर मुक्त होण्यासाठी विविध मार्गांचा प्रयत्न करू शकतो.



उचकीसाठी वैद्यकीय संज्ञा सिंगुल्टस आहे. शरीरविज्ञानाच्या दृष्टीने, जेव्हा डायफ्राम (उदरपटल - छातीतील व पोटातील पडदा) आणि इंटरकोस्टल स्नायू अचानक अनैच्छिकरित्या संकुचित होतात तेव्हा उचकी येते. स्वरयंत्र किंवा व्हॉइस बॉक्स एकाच वेळी आकुंचन पावते आणि व्होकल कार्ड्स बंद होतात, ज्यामुळे हवेचा प्रवाह प्रभावीपणे अडकतो.

भराभर खाणे किंवा पिणे यामुळे बऱ्याचदा उचकी येते. बहुधा उचकी कोणत्याही वैद्यकीय हस्तक्षेपाशिवाय आपोआप थांबते. उचकी लहानांपासून मोठ्या प्रौढांपर्यंत सर्वांनाच होऊ शकते. उचकी येण्याचे नेमके कारण नेहमी माहिती नसते. तथापि, उदरपटलातील मज्ञातंतूंना त्रास देणारी कोणतीही स्थिती संभाव्यत: उचकी आणू शकते. इतर अनेक घटक देखील भूमिका बजावू शकतात.

मसालेदार पदार्थ खाणे, गरम द्रव पदार्थ पिणे, कार्बोनेटेड किंवा फसफसणारी पेये पिणे, खूप वेगाने खाणे, विशिष्ट औषधे घेणे- मोठ्या आकाराच्या किंवा जास्त प्रभावी, अनेक औषधी गोळ्या एकत्र घेणे, तीव्र भावना किंवा तणाव अनुभवणे. बहुतेक प्रकरणांमध्ये, उचकी काही मिनिटांतच स्वतःच निघून जाते. उचकीस कारणीभूत असलेल्या कोणत्याही मूलभूत परिस्थितीचा उपचार केल्यास त्यांची वारंवारता कमी होण्यास मदत होते.

उचकी सुरू झाल्यावर काही गोष्टी कराव्यात. श्वास घेणे आणि सुमारे १० सेकंद श्वास रोखून ठेवणे, नंतर श्वास सोडण्यापूर्वी आणखी दोन वेळा श्वास घेणे, कागदी पिशवीत श्वास घेणे पण पिशवीने डोके झाकणार नाही याची काळजी घेणे, गुडघे छातीवर आणून त्यांना मिठी मारणे, पुढे झुकून छाती हळूवारपणे संकुचित करा.

बाळांना बऱ्याचदा उचकी येते, जी त्यांच्या विकासाचा एक भाग असतो आणि सामान्यत: त्यांना त्रास देत नाही. तथापि, उचकी कधी कधी आहार आणि झोपेत व्यत्यय आणू शकते. जर आहारादरम्यान उचकी येत असेल तर बाळाची स्थिती बदलणे, बाळाला कुरवाळणे, बाळाला शांत करणे हे करावे म्हणजे उचकी बंद होईल. बाळाला वारंवार उचकी येत असेल तर डॉक्टरांशी बोलले पाहिजे.

# रायगडातून १२४६ सदस्य, १६८ सरपंच रिंगणात

## २१० ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी उद्या मतदान

**रायगड : प्रतिनिधी**

जिल्ह्यातील ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीत २१० ग्रामपंचायतींपैकी १२४६ सदस्य पदांसाठी व १६८ ग्रामपंचायतींच्या सरपंच तर ५ नोव्हेंबर रोजी मतदान होईल. २१० सरपंच पदांपैकी ३८ पदे बिनविरोध तर १८५४ सदस्य पदांपैकी ५६४ सदस्य पदे बिनविरोध झाली आहेत, अशी माहिती उपजिल्हाधिकारी सामान्य प्रशासन विठ्ठल इनामदार यांनी दिली आहे.



रायगड जिल्ह्यात अलिबाग तालुक्यातील १५, मुरूड १५, पेण ११, पनवेल १७, उरण ३, कर्जत ७, खालापूर २२, रोहा १२, सुधागड १३, माणगाव २६, तळा ६, महाड २१, पोलापूर २२, श्रीवर्धन ८ आणि म्हसळा १२ अशा २१० सार्वत्रिक निवडणूक तर ९९ सदस्यपदांसाठी आणि १० सरपंचांच्या रिक्तपदांच्या पोटनिवडणुकांचा कार्यक्रम सुरू आहे. १६ ते २० ऑक्टोबरदरम्यान उमेदवारी अर्ज दाखल करणे, अर्जांची छानननी २३ ऑक्टोबर रोजी, २५ ऑक्टोबर रोजी अर्ज माघारी अशी प्रक्रीया पार पडली आहे. आता ५ नोव्हेंबर रोजी मतदान व ६ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे.

सार्वत्रिक निवडणुकीत जिल्ह्यातील २१० ग्रामपंचायतींतील १८५४ सदस्यांसाठी निवडणूक जाहीर झाली होती. १८५४ जागांपैकी माणगाव, तळा, मुरुड, पनवेल, महाड, पोलादपूर श्रीवर्धन, म्हसळा येथील ४४ जागांवर एकही अर्ज दाखल झाला नाही. तर अलिबाग ५, मुरूड २४, पेण ३६, पनवेल १३, उरण २, कर्जत ४, खालापूर ४९, रोहा १६, सुधागड २३, माणगाव १२०, तळा ३८, महाड ७४, पोलादपूर ६८, श्रीवर्धन २९ आणि म्हसळा ६३ अशा एकूण ५६४ सदस्य पदे बिनविरोध झाली आहेत. त्यामुळे आता अलिबाग १५२, मुरुड ११०, पेण पनवेल ७५, १६१, उरण ३९, कर्जत ६३, खालापूर १५३, रोहा ९८, सुधागड ८८, माणगाव ९८, तळा ९, महाड ७०, पोलादपूर ९१, श्रीवर्धन २० आणि म्हसळा १९ अशा एकूण १२४६ सदस्य पदांसाठी निवडणूक मतदान होईल.

थेट सरपंच पदांच्या २१० जागांपैकी महाड, पोलादपूर येथे प्रत्येकी एक व श्रीवर्धन येथे दोन अशा चार ठिकाणी एकही वैध अर्ज दाखल झालेला नाही. तर उमेदवारी अर्ज माघारीनंतर मुरूड, पेण, तळा, श्रीवर्धन येथे प्रत्येकी दोन, सुधागड येथे तीन, पोलादपूर, माणगावात प्रत्येकी पाच, महाडमध्ये आठ तर म्हसळा तालुक्यात नऊ अशी एकूण ३८ सरपंच पदे बिनविरोध झाली आहेत. त्यामुळे आता अलिबाग १५, मुरूड १३, पेण ९, पनवेल १७, उरण ३, कर्जत ७, खालापूर २२, रोहा १२, सुधागड १०, माणगाव २१, तळा ४, महाड १२, पोलादपूर १६, श्रीवर्धन ४ आणि म्हसळा ३ अशा एकूण १६८ ग्रामपंचायतींमध्ये सरपंच पदासाठी निवडणूक होणार आहे.

# प्रचारासाठी समाज माध्यमांचा आधार

## व्हॉट्सअ‍ॅप स्टेट्स, फेसबुकवरून कामांचा प्रचार व मतदानाचे आवाहन





**पाली : प्रतिनिधी**

ग्रामपंचायत निवडणुकांचा प्रचार शिगेला पोहचला आहे. उमेदवार व कार्यकर्त्यांचा घरोघरी भेटीवर भर असला तरी प्रचारासाठी समाजमाध्यमांचासुद्धा अधिक वापर होत आहे. व्हॉट्सअ‍ॅप फेसबुकवरून कामांचा प्रचार व आपल्यालाच किंवा आपल्या उमेदवाराला मतदान करण्याचे आवाहन केले जात आहे. याचवेळी विरोधकदेखील प्रतिस्पर्धी उमेदवारांवर समाज माध्यमांतून टीकास्त्र सोडत आहे.

रायगड जिल्ह्यातील २१० ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी आणि ९९ सदस्यपदाच्या; तर १० सरपंचांच्या रिक्तपदांच्या पोटनिवडणुकांसाठी ५ नोव्हेंबर २०२३ रोजी मतदान होणार आहे. त्यामुळे प्रचारासाठी अवघे दोन दिवस शिल्लक आहेत. अशावेळी प्रत्येकाला भेटणे किंवा सतत त्यांच्या संपर्कात राहणे महत्त्वाचे आहे. पण वेळेच्या मर्यादेमुळे हे शक्य होत नाही. मग अशावेळी समाजमाध्यमे मोठ्या प्रमाणात कामी येत आहेत. जवळपास सर्वच पक्ष उमेदवारांच्या पॅनलचे डिजिटल बॅनर व व्हिडीओ तयार केले आहेत. फेसबुक, इंस्टाग्राम व व्हॉट्सअप यावर उमेदवार व कार्यकर्ते हे डिजिटल बॅनर टाकून मतांचा जोगवा मागतांना दिसत आहेत. शिवाय मागील पाच वर्षातील कामांचा लेखाजोखादेखील समाज माध्यमांवर दिला जात आहे.

सत्तेत असतांना केलेली कामे, राबविलेल्या योजना व उपक्रम यांचे फोटो, व्हिडीओ व माहिती प्रसारित केली जात आहे. याशिवाय अनेक जणांनी आपला अजेंडा देखील समाज माध्यमांवर प्रसारित केला आहे. या सगळ्यात सामान्य मतदारांचे मात्र चांगले मनोरंजन होत आहे.

**मोर्चे बांधणीसाठी प्रभावी**

*उमेदवार व विविध पक्षांनी आपले कार्यकर्ते व पदाधिकारी यांचे तात्पुरते व्हॉट्सअप ग्रुप तयार केले आहेत. यावर सभा, भेटीगाटी, प्रचार आदींवर चर्चा, नियोजन केले जाते. शिवाव आढावा घेणे व व्युव्हरचना ठरवली जात आहे. पदाधिकारी व कार्यकर्त्यांची प्रत्यक्ष बैठक घेण्यापेक्षा हे अधिक जास्त प्रभावी ठरत आहे. शिवाय वेळ व खर्च देखील वाचतो.*

**शहरातील मतदारांना संपर्क**

*बहुसंख्य मतदार हे सहकुटूंब कामानिमित्त मुंबई, ठाणे व पुणे आदी शहरांत गेले आहेत. हे मतदार एकगठ्ठा मतदान करतात. त्यामुळे समाज माध्यमांद्वारे या मतदारांच्या सातत्याने संपर्कात राहिले जात आहे. त्यांना शुभेच्छा संदेश पाठविणे नियमित विचारपूस करणे. कामाची माहिती देणे अशा गोष्टी सुरू आहेत.*

# खालापूरमध्ये ग्रामपंचायत निवडणूकीत हायटेक प्रचार

**खोपोली : प्रतिनिधी**

निवडणुकीची तारीख जशी जवळ येऊ लागली, तसा ग्रामपंचायत निवडणुकीचा प्रचाराचा वेग वाढत चालला आहे. घरोघरी गाठीभेटी, पत्रके वाटणे, त्याचप्रमाणे सोशल मीडियावरील हायटेक प्रचारावर यावेळेस जास्त जोर देण्यात आला.

खालापूर तालुक्यात २२ ग्रामपंचायतीमध्ये निवडणुका होत असून, बहुतांश खालापूर तालुका औद्योगिक पट्टात येत असल्याने ग्रामपंचायतीवर आपल्याच पक्षाचा वर्चस्व असावं यासाठी कार्यकर्त्यांची अहोरात्र प्रयत्न सुरू आहे. यावेळेस महायुती विरुद्ध महाआघाडी असा सरळ सरळ सामना अनेक ग्रामपंचायत मध्ये दिसून येत आहे.



खालापूर तालुक्यात सर्वांत मोठी ग्रामपंचायत म्हणून सांवरोली ग्रामपंचायतकडे पाहिले जाते ही ग्रामपंचायत औद्योगिक पट्ट्यात येत असल्याने या ग्रामपंचायतीवर वर्चस्व मिळवण्यासाठी राजकीय पक्षांनी जोरदार मोर्चे बांधणी केली आहे. आतापर्यंत या ग्रामपंचायतीवर शिवसेनेचे वर्चस्व होते. ज्येष्ठ कार्यकर्ते तथा शिवसेना नेते गोविंद बैलमारे यांची या ग्रामपंचायतीवर एक हाती सत्ता असल्याचे बोलले जाते. गेली ३५ वर्षे सामाजिक व राजकीय क्षेत्रात काम करीत असल्यामुळे तळागाळाशी लोकांची त्याचप्रमाणे आदिवासी वाड्यांवर गोविंद बैलमारे यांचे वर्चस्व असल्याचे बोलले जात आहे. विद्यमान आमदार महेंद्र थोरवे यांचे ते कट्टर समर्थक असल्याने शिवसेना शिंदे गटाने यावेळेस आपली ताकद या निवडणुकीत लावल्याचे बोलले जाते.

शिवसेनेच्या समोर महाआघाडीचे संतोष बैलमारे हे पुन्हा रिंगणात आहेत. त्यांनी गोविंद बैलमारे यांना आव्हान दिले आहे. त्यामुळे या ग्रामपंचायतीमध्ये बैलमारे विरुद्ध बेलमरे असा सामना पहावयास मिळत आहे. गोविंद बैलमारे यांनी मात्र आमचेच पॅनल बहुमताने निवडून येणार असा दावा केला आहे. त्यामुळे ५ नोव्हेंबरच्या निवडणुकीत मतदार कोणाला कौल देतात याकडे साऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# ब्रेक फेल झाल्याने ट्रक हाईट बॅरिकेड्सवर अडकला

## कारमधील दोघे बालंबाल बचावले; बोरघाटातील घटना



**खालापूर : प्रतिनिधी**

बोरघाटातून जुन्या मुंबई-पुणे महामार्गाने खंडाळा येथून मुंबईकडे माल वाहून नेणारा ट्रक अंडा पॉईंटजवळ आला असता ब्रेक फेल झाल्याने हाईट बॅरिकेड्सला आदळल्याने जागीच थांबला.

त्याचदरम्यान बदलापूर येथील दोघे कारने जुन्या महामार्गाने खंडाळा येथे जात होते. त्यांची कार हाईट बॅरिकेड्सजवळ आली असता हा ट्रक हाईट बॅरिकेड्सला आदळून कारला धडकला. सुदैवाने कारला मोठा अपघात झाला नाही. या अपघातात कारमधील मिलिंद अशोक भवर (वय २६ रा. बदलापूर), अभिजित अंकुश कळसकर (वय ४२, रा. बदलापूर) हे जखमी झाले.

## प्रदीप गोगटे यांना पुरस्कार

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जतमधील अभिनेते, दिग्दर्शक प्रदीप गोगटे



'आर्टस बिट्स फाऊंडेशन' पुणे यांचा 'इंडिया एक्सलेन्स पुरस्कार २०२३-२४चे मानकरी ठरले आहेत.

प्रदीप गोगटे कर्जतच्या बालकलाकारांना घेऊन केलेल्या शॉर्टफिल्म 'वळण' आत्तापर्यंत ९७ पुरस्कार मिळाले असून लवकरच शंभर पुरस्कार मिळवणारी 'वळण' ही रायगड जिल्ह्यातील एकमेव शॉर्टफिल्म म्हणून इतिहास रचणार आहे. लवकरच स्वत:चे व्यावसायिक नाटक ही ते घेऊन येत आहेत, ज्यात ते स्वतः अभिनय करणार आहेत. अशा या हरहुन्नरी कलाकाराचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## दिवाळीसाठी बाजारपेठेत रोषणाई

**अलिबाग :** दिवाळी म्हणजे प्रकाशाचा सण या सणाला काही दिवस उरले असल्याने जिल्ह्यासह अलिबागमध्ये बाजारपेठेत विविध रोषणाई दिसून येत आहे. यामध्ये विविध प्रकारच्या दिवे, लाईटच्या पणत्या, आधुनिक कंदिल तसेच लाईटींचे तोरण यांची मोठ्या प्रमाणावर विक्री होत आहे. नागरिकांनीही खरेदीसाठी गर्दी केल्याचे चित्र बाजारपेठांमध्ये दिसत आहे.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**RE-TENDER EXTENSION NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors/agencies on Mahatransco E-Tendering website https://srmetender.mahatransco.in for following work

| Tender No.: EE/400kV/RS(O&M)/DN/KHR/Re-Ten-2/23-24 (RFX No. 7000028585) | Period for submission of E-Bid: 03.11.2023 to 10.11.2023 up to 23:59hrs |
|---|---|

Name of Work: Extension of existing **SECURITRON** make Fire Detection and Alarm System to 33kV GIS room at 400kV RS, Kharghar

| Estimated cost : | EMD (Rs.): | Tender fee (Rs.): | Closing date | Technical opening date | Commercial opening date |
|---|---|---|---|---|---|
| Rs. 5,31,308.57/- (Including GST) | Rs. 5,313.09/- | Rs.590/- including GST | 10.11.2023 up to 23:59 hrs | 11.11.2023 at 10:00 hrs (If possible) | 11.11.2023 at 10:15 hrs (If possible) |

**Contact Persons:** 1) Mr. S.J.Darekar, Executive Engineer-Charge, 400kV RS O&M Dn., Kharghar, **9619892040** 2) Ms. P.C.Deshpande, Dy.EE (O), 400kV RS O&M Dn., Kharghar, **9819313988** For further details visit our website www.mahatransco.in

1] Tender documents can be downloaded by only online from aforesaid website. 2] Eligible contractor should submit their bid well in advance instead of waiting till last date. MSETCL will not be responsible for non-submission of Bid due to any website related problems. **Note :-** All eligible interested contractors are mandated to get enrolled on SRM E-Tender portal (New) - https://srmetender.mahatransco.in.

Sd/-
Executive Engineer (I/C.),
400kV R.S. (O&M) Dn.,Kharghar



**परिशिष्ट क्र. १६**
**(उपविधी क्र. ३५ अन्वये )**
**मयत सदस्याचे संस्थेच्या भांडवलात/मालमत्तेत असलेले हितसंबंध व भाग हस्तांतरित करण्याबाबत हक्क मागण्या किंवा हरकती मागविण्यासाठी द्यावयाच्या नोटिशीचा नमुना**
**नोटीस**

सरकारी नोकर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, पत्ता नवीन पनवेल या संस्थेचे सदस्य असलेल्या वा संस्थेच्या इमारतीत / भूखंडावर / गाळा/ बंगला क्र..... धारण करणाऱ्या श्री/ परशुराम कृष्णाजी लांगी यांचे तारीख १०/१०/२०२३ रोजी निधन झाले. त्यांनी नामनिर्देशन केलेले नाही. संस्था, या नोटिशीद्वारे संस्थेच्या भांडवलात/मालमत्तेत असलेले मयत सदस्याचे भाग व हितसंबंध हस्तांतरित करण्यासंबंधी मयत सदस्याचे वारसदार किंवा अन्य मागणीदार/हरकतदार यांच्याकडून हक्क मागण्या/हरकती मागवण्यात येत आहेत. ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसात त्यांनी आपल्या मागण्यांच्या वा हरकतींच्या पुष्टयर्थ आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती व अन्य पुरावे सादर करावेत. जर वर नमूद केलेल्या मुदतीत, कोणाही व्यक्तीकडून हक्क मागण्या किंवा हरकती सादर झाल्या नाहीत तर, मयत सदस्याचे संस्थेच्या भांडवलातील/मालमत्तेतील भाग व हितसंबंध यांच्या हस्तांतरणाबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्याची संस्थेला मोकळीक राहील. जर अशा कोणत्याही हक्कमागण्या / हरकती आल्या तर त्याबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्यात येईल. नोंदी व उपविधींची एक प्रत मागणीदारांस/हरकतदारांस पहाण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात सचिव यांचेकडे/ दुपारी १२.०० वा ते ४.०० वा पर्यंत, नोटिस दिल्याच्या तारखेपासून नोटिशीची मुदत संपण्याच्या तारखेपर्यंत उपलब्ध राहील.

सरकारी नोकर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित
यांच्या करिता आणि वतीने

**ठिकाण :- पनवेल**
**दिनांक : ०२/११/२०२३**

**सचिव /-**
**सरकारी नोकर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित**
**सेक्टर २, नवीन पनवेल**



**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील प्रमाणे वर्णन केलेली मिळकत जमीन मालक **श्री सिताराम सुदाम चव्हाण,** रा. लोणिवली, ता. पनवेल, जि.. रायगड यांजकडून सदर मिळकत विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे लोणिवली, ता. पनवेल, जि. रायगड.**

| स.नं. | हि.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १९४ | २० | ०-२८-०० | ०.५३ |

तरी सदरहू मिळकतीवर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, वा तत्सम कोणतेही दावे माल की वा अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबधीतांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे याबाबत दिनांक १८/१०/२०२३ रोजीच्या अंकामध्ये नजरचुकीने मिळकतीचे क्षेत्र ०-२५-०० लिहीले हाते ते ०-२८-०० समजण्यात यावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तकार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तकारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरून आमचे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी. व सदर मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

**पनवेल.**
**दिनांक :- ०४/११/२०२३.**

**खरेदीदाराचे वकील**
**सही/-**
**ॲड. एस. के. राणे**
**पत्ता : शॉप नं. १२३, मुन्सीपल शॉपींग कॉम्पलेक्स, पहिला मजला भाजी मार्केटजवळ, पनवेल ता. पनवेल जि. रायगड.-४१०२०६,**
**मो.नं. ९८१९८६९२१२**



वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा राम प्रहर



**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे-मानघर, ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत १) श्री. कुंडलिक उर्फ पुंडलिक त्रिंबक दमडे २) श्री. प्रकाश पदम उर्फ पद्माकर दमडे ३) श्री. बामु पदम उर्फ पद्माकर दमडे ४ ) कमलाबाई उर्फ कमळीबाई पदम उर्फ पद्माकर दमडे यांचेकडून खरेदीखताने कायमस्वरुपी खरेदी करण्याचे योजिले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे- मानघर, ता. पनवेल, जि. रायगड**

| भूमापन/गट क्र. | भूमापन/गट क्र.चा उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| ४८ | ० | ०-७९-०० | ३.०३ |

वर नमूद मिळकतीस अनुसरून कुणीही व्यक्ती, संस्था, कंपनी, भागीदारी इत्यादींचा कुठल्याही प्रकारचा दान, गहाण, तारण, खरेदी, बयाणा, कर्ज, पोटगी, अन्न, वस्त्र, निवारा, वहिवाट, बक्षिस इत्यादीद्वारे मालकी अथवा इतर कसलाही हक्कहितसंबंध असल्यास, सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांचे आत आपले हक्क हितसंबंधाच्या स्वरूपासहीत प्रथमदर्शनी पुराव्यासह खालील सही करणार यांसकडे खाली नमूद पत्त्यावर आपल्या लेखी हरकती रजिस्टर पोस्टाद्वारे अथवा समक्ष दाखल कराव्यात, सदर २१ दिवसांचे आत कुणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास आमचे अशिल सदर वर नमूद मिळकतीचे खरेदीखत कायदेशीरपणे पूर्ण करतील व त्यानंतर मागावून आलेल्या कसल्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत.

**दिनांक - ०३/११/२०२३**
**ठिकाण - पनवेल**

**सही/-**
**ॲड. शरद जाधव**
**संपर्कासाठी पत्ता- तळमजला, रॉयल प्राईड बिल्डींग, भूखंड क्र. ११३, मिडल क्लास को. ऑप. हौ. सोसायटी, पनवेल-४१०२०६, ता. पनवेल, जि. रायगड**
**मो.नं. ९८२०६३७१७५**



**अलिबाग नगरपरिषद, अलिबाग**
जाहिर निविदा सुचना

जा.क्र अनप/आरोग्य/२७४६ दिनांक : ३/११/२०२३

स्वच्छ सर्वेक्षण व माझी वसुंधरा जनजागृती करणे कामी भिंतीवर चित्रे व अक्षरे काढणेबाबत व टायर टयूब पुरविणेबाबत खालील तपशिल प्रमाणे निविदा मागविण्यात येत आहे...

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रक |
|---|---|---|
| १ | अलिबाग हददीतील हिराकोट तलाव व अजूबाजूच्या परिसरातील भिंतीची रंगरंगोटी करणे. | १,९८,८९७/ |
| २ | अलिबाग रामुद्र किनाऱ्यावरील पाणपोई व आजूबाजूच्या परिसरातील भिंतीची रंगरंगोटी करणे | १,८८,०८१/- |
| ३ | महाविर चौक, बस स्टैन्ड परिसर, मराठी शाळा या ठिकाणचे तसेच आजूबाजूच्या परिसरातील भिंतीची रंगरंगोटी करणे | १,९४,४०३/- |
| ४ | मा. न्यायाधिश निवासस्थान या मा. जिल्हाधिकारी कार्यालय येथील भिंतीच रंगरंगोटी करणे | १,८०, १४९/- |
| ५ | जिल्हा न्यायालय ते तहसिल कार्यालय येथील भिंतीच रंगरंगोटी करणे | १,८०,४९७/- |
| ६ | पाणी टैंकर करिता टायर व टयूबचा पुरठा करणे | नं. १. २५.१६ MRF |
| ७ | जेसीबी करिता पुढील व मागिल टायर ट्यूबचा पुरवठा करणे | पुढील ७.५०.१६ MRF<br>मागिल १४.९.२४ MRF |

वरील प्रमाणे प्रत्येक कामासाठी स्वतंत्र निविदा भरणे आवश्यक आहे. तसेच दिलेल्या विषयानुसार प्रत्यक्ष पहाणी करुन प्रति स्वेअफुटमध्ये दर देणेचे आहे तसेच अधिक माहिती निविदा फॉर्म मध्ये देण्यात आली असून निविदा फॉर्म करिता आरोग्य विभागात संपर्क करावा.

**सही/-**
**(अंगाई साळुखे)**
**मुख्याधिकारी अलिबाग नगरपरिषद**



**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पनवेल**
**पिनकोड-४१०२०६**
**E-mail- panvel.ee@mahapwd.com**
**दूरध्वनी क्रमांक ०२२-२७४५२७७८ फॅक्स - ०२२-२७४६७४४०**
**ई- कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र. ११४ (ई-निविदा) सन २०२३-२४**

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दूरध्वनी क्र. ०२२-२७४५२७७८ फॅक्स - ०२२- २७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील योग्य त्या नोंदणीकृत रायगड जिल्यातील सुशिक्षीत बेरोजगार कामांकरिता बी-१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑफलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई-निविदा सूचना www.mahapwd.com उपलब्ध करुन देणेत आलेली आहे

टिप- या निविदेमध्ये एकूण ११ कामे समाविष्ट असून ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक ०४.११.२०२३ सकाळी १०.०० ते दिनांक ११.११.२०२३ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेतस्थळावर उपलब्ध करून देणेत आलेली आहे.

**ई-निविदा जा.क्र./सा.बां./पनवेल/....**

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**सा.बां. विभाग, पनवेल, जि. रायगड**
**दिनांक :- ०३/११/२०२३**

**सही/-**
**कार्यकारी अभियंता,**
**सा. बां. विभाग, पनवेल**

विमाका/कोवि/२०२३-२०२४/२००

# नवी मुंबईत अनेक वास्तू धूळखात

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई महापालिका प्रशासनाने कोट्यवधी रुपये खर्च करून शहरातील विविध ठिकाणी वास्तू निर्माण केल्या आहेत. मात्र, त्यातील काही वास्तूंचे उद्घाटन होऊनही त्यांचा वापर सुरू झालेला नाही, तर काही वास्तू उद्घाटनाच्या लाल फितीत अडकलेल्या आहेत. या इमारती अनेक महिने वापराविना असल्यामुळे त्यांच्या देखभाल-दुरुस्तीवर महापालिका प्रशासनाला पुन्हा लाखोंचा खर्च करावा लागण्याची शक्यता आहे.

नवी मुंबई शहरात पालिकेची आठ विभाग कार्यालये आहेत. येथे बहुउद्देशीय इमारती, पाळणा घर, रात्रनिवारा केंद्र, व्यायामशाळा, ग्रंथालये, बाजार संकुले यांसह विविध प्रकारच्या इमारती उभारल्या आहेत. त्यापैकी काही इमारतींचे पाच ते सहा वर्षांपासून उद्घाटन झालेले नाही; तर काही इमारतींचे उद्घाटन होऊनही त्याचा वापर केला जात नाही.



ऐरोलीपासून ते बेलापूरपर्यंत पालिकेच्या जवळपास ५० वास्तू वापराविना पडून आहेत. यातील बहुतांश वास्तू या अभियांत्रिकी विभागाकडून मालमत्ता विभागाकडे हस्तांतरित झाल्या आहेत.

सध्या वाशी, कोपरखैरणे, सानपाडा, नेरूळ शिरवणे, बेलापूर-सीबीडी येथे दैनंदिन बाजाराच्या नव्या कोऱ्या वास्तू उभारण्यात आल्या आहेत. त्यांना अद्याप उद्घाटनाची प्रतीक्षा आहे. फेरीवाल्यांना तेथील गाळ्यांचे वाटप न झाल्याने नाराजी व्यक्त केली जात आहे. त्यामुळे फेरीवाले रस्त्यावरच व्यवसाय मांडत असल्याचे सर्वत्र चित्र आहे.

## महापालिका हद्दीतील इमारतींच्या देखभाल-दुरुस्तीची होतेय मागणी

"शहरात ज्या वास्तू आहेत त्या सर्वांचा आढावा घेण्यात आला आहे. तसेच ज्या इमारती वापराविना आहेत, त्यासंबंधी निविदा काढण्यात आल्या आहेत. त्यानंतर नागरिकांच्या मागणीनुसार देण्यात येतील.

**-राजेश नार्वेकर,** महापालिका आयुक्त

"मनपाने किमान या वास्तूसाठी जो काही कोट्यवधी रुपये खर्च केला आहे, त्यासाठी किमान वास्तू वापरता आल्या पाहिजेत.

**-नीलेश कचरे,** नागरिक

### या वास्तू वापराविना

- दैनंदिन सानपाडा बाजार, सेक्टर ४
- सानपाडा व्यायामशाळा
- सानपाडा बहुउद्देशीय इमारत
- स्वामी विवेकानंद सांस्कृतिक भवन, वाशी
- वाशी येथील महात्मा ज्योतिबा फुले स्मृतिभवन, वाशी
- जुईनगर बहुउद्देशीय इमारत
- घणसोली येथील रात्रनिवारा केंद्र
- कोपरखैरणे, सेक्टर १५-१६ भाजी मंडई
- वाशी, सेक्टर १५-१६, नाल्यावरील गाळे
- घणसोली, सेक्टर ७, समाजमंदिर
- सीवूड, सेक्टर ४८ मधील पाळणाघर तीन वर्षे धूळखात
- जुईनगर येथील प्राण्यांचा दवाखाना

# चिरनेर ग्रामपंचायत निवडणुकीत भाजपच्या नव्या चेहऱ्यांना संधी

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

चिरनेर ग्रामपंचायतीची निवडणूक येत्या ५ नोव्हेंबर रोजी होणार असून, भारतीय जनता पक्षाने विशेषतः नव्या चेहऱ्यांना संधी देत, एक वेगळा संदेश तालुक्यात दिला आहे. प्रतिक गोंधळी हे थेट सरपंच पदाचे उमेदवार असून, त्यांच्या नेतृत्वाखाली ही लढत आहे.

चिरनेर ग्रामपंचायतीच्या निवडणुकीसाठी सदस्यपदाचे उमेदवार म्हणून माजी ग्रामपंचायत सदस्य रमेश फोफेरकर यांच्यासह सुशील पाटील, रमेश गोंधळी, अजिंक्य ठाकूर, समीर डुंगीकर, अंकित म्हात्रे, सिताराम कातकरी, अश्विनी कातकरी, प्रणोती पाटील, सरिता खारपाटील, मेघा चिरलेकर, अश्विनी नारंगीकर, वनश्री खारपाटील हे सर्व उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.



या सर्व उमेदवारांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, भाजपच्या उमेदवारांचे वर्चस्व दिसून येत आहे. भाजपचे ज्येष्ठ नेते पी.पी. खारपाटील, राजेंद्र खारपाटील, धनंजय गोंधळी, समीर खारपाटील, सागरशेठ खारपाटील, संजीवकुमार भगत, सुशांत पाटील, करण पाटील, स्वप्नील पाटील, संजय गोंधळी, सुधीर पाटील, संताजी गोंधळी, सुजित पाटील, नारायण गोंधळी, नितीन गोंधळी, सुहास गोंधळी, गणेश पाटील, नंदकुमार चिरनेरकर, प्रकाश गोंधळी, प्रियांका पाटील, प्रेमला गोंधळी, प्रथमेश गोंधळी, संदीप गोंधळी, योगेश खारपाटील, अनिकेत गोंधळी, जयेश खारपाटील, उपकार गोंधळी स्वप्निल खारपाटील, नमस्ते मोकल, तसेच अन्य कार्यकर्ते विशेष मेहनत घेत आहेत.

## शेअर मार्केटमध्ये मोठ्या परताव्याचे आमिष

# नवी मुंबईत एकाला कोट्यवधींचा गंडा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सट्टा बाजार अर्थात शेअर मार्केट मध्ये जादा आमिष दाखवून वाशीतील एका व्यक्तीची तब्बल एक कोटी ३७ लाख ५० हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केली आहे. या प्रकरणी गुन्हा नोंद करण्यात आला असून सायबर शाखा आरोपीचा शोध घेत आहे.

अजिंक्य भंवर, आयर्न गुप्ता, ग्लोरिया, स्टक मार्केट समुद प्रशासक, सेवा केंद्र (कस्टमर सर्व्हिस) असे यातील आरोपींची नावे आहेत तर शंकर वेंकटाचलम, असे फिर्यादीचे नाव आहे. २१ जुलै रोजी शंकर यांच्या मोबाईल




वर शेअर मार्केट मध्ये गुंतवणूक करा गुंतवणुकीत मोठ्या प्रमाणात फायदा होईल असे आमिष फोन करणाऱ्या अजिंक्य भंवर नामक व्यक्तीने दाखवले. त्यामुळे सुरवातीला थोडी थोडी गुंतवणूक शंकर यांनी केली. त्याला मोठ्या प्रमाणात परतवा त्यांना मिळाला त्यामुळे त्यांनी गुंतवणूक रकमेत वाढ केली मात्र काही दिवसांनी त्यांना परतावा कमी कमी होत गेला. त्यामुळे गुंतवणूक रकमेत वाढ करा चांगल्या ठिकाणी गुंतवणूक करतो असे आश्वासन आरोपींनी दाखवले.

सुरुवातीला गुंतवणुकीवर चांगला परतावा मिळाला असल्याने शंकर यांनी गुंतवणूक रकमेत हळू हळू वाढ केली. अशा प्रकारे त्यांनी एकूण एक कोटी ३७ लाख ५० हजार रुपयांची गुंतवणूक केली. ही गुंतवणूक करताना आरोपी सांगेल त्या त्या विविध बँक खात्यात ही गुंतवणूक केली. हा प्रकार २१ जुलै ते १८ ऑक्टोबर दरम्यान झाला. त्या दरम्यान आरोपींनी दिलेल्या कस्टमर सेवा केंद्राशी संपर्क साधण्याचा आला, मात्र गुंतवणूक वाढवण्याचा सल्ला देण्यात आला. कालांतराने गुंतवणूक करणे बंद केले, मात्र हे कळताच आरोपींनी संपर्क बंद केला. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर शंकर यांनी वाशी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

या तक्रारीची शहानिशा करून १ नोव्हेंबरला गुन्हा दाखल करण्यात आला, अशी माहिती सायबर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन कदम यांनी दिली.

# सार्वजनिक शौचालयाविना महिला कर्मचाऱ्यांची गैरसोय

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईतील टीटीसी औद्योगिक क्षेत्रात सार्वजनिक शौचालयाची सुविधा नसल्यामुळे कामानिमित्त आलेल्या कर्मचाऱ्यांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. विशेषत: महिला कर्मचाऱ्यांची मोठी कुचंबणा सहन करावी लागत आहे. तसेच औद्योगिक वसाहतीत येणारे ट्रकचालक आणि वाहक, कर्मचारी उघड्यावरच प्रातर्विधी करत असल्यामुळे दुर्गंधी पसरत आहे.

महापालिकेकडून ठाणे-बेलापूर रस्त्यासह विविध डेपोमध्ये ई-टॉयलेट उभारले आहेत. सध्या त्या टायलेटलाही टाळे ठोकण्यात आले आहे. सार्वजनिक टॉयलेटची सुविधा नसल्यामुळे लघुशंका करायची कुठे, असा प्रश्न एमआयडीसीमध्ये येणाऱ्या कर्मचाऱ्यांना पडत आहे. त्यामुळे नाइलाजास्तव उघड्यावर लघुशंका करावी लागत आहे.

एमआयडीसीमध्ये पालिकेचे संपूर्ण दुर्लक्ष होत असल्यामुळे एमआयडीसी व उद्योजकांच्या माध्यमातून रस्ते दुरुस्तीचे काम करण्यात येत आहे. पालिकाही एमआयडीसीबाबत दुजाभाव करत आहे. एमआयडीसीमध्ये कोणत्याही प्रकारची व्होटबँक नसल्यामुळे लोकप्रतिनिधी या भागाबद्दल कधीच आवाज उठवत नाहीत, असे येथील कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे.

### जागा उपलब्ध झाल्यानंतर मिळणार सुविधा

नवी मुंबई महापालिकेचे घनकचरा व्यवस्थापन उपायुक्त बाबासाहेब रांजळे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी एमआयडीसीने जागा उपलब्ध केल्यास एमआयडीसी परिसरात शौचालये बांधता येऊ शकतील, असे सांगितले. एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी राजेंद्र बोरकर यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी एमआयडीसीतील संघटनांनी मागणी केल्यास शौचालयासाठी जागा उपलब्ध करून देता येईल. एमआयडीसीच्या स्मॉल स्केल इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष के. आर. गोपी यांच्याशी संपर्क साधला असता तो होऊ शकला नाही.

## पनवेलमध्ये बसमधून ४०५ लीटर डिझेलची चोरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल परिसरातून विविध राष्ट्रीय व राज्य महामार्ग जात असल्याने मोठ्या प्रमाणात दळणवळण असलेल्या रस्त्यांकडे रात्रीच्या वेळेस उभ्या वाहनातून डिझेल चोरणारी टोळी सक्रिय आहे, मात्र ट्रक व ट्रेलरमधून डिझेल चोरणाऱ्यांनी पहिल्यांदाच गावातील उभ्या बसमधून डीझेल चोरी केल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. पनवेल बस आगारातील चालकाने याविषयी रितसर पोलीस ठाण्यात अनोळखी चोरट्यांविरोधात तक्रार केली आहे.

पनवेल तालुक्यातील केळवणे गावामध्ये गुरुवारी पहाटे उभ्या असलेल्या बसमधून डिझेल चोरी झाल्याचे चालकाला समजले. चालकाने पोलिसांत दाखल केलेल्या तक्रारीमध्ये ४०५ लीटर डिझेल चोरले असून या डीझेलची किमंत ३८ हजार रुपये असल्याचे पोलिसांना सांगितले. पोलिसांनी रस्त्याकडेला डीझेल चोरी करणाऱ्या टोळीला पकडण्यासाठी रात्रगस्तमध्ये वाढ करणे गरजेचे झाले आहे.

## जॉगिंग ट्रॅक बनविण्यासाठी ना हरकत प्रस्ताव पाठवावा

### विशाल डोळस यांची आयुक्तांकडे मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

जॉगिंग ट्रॅक बनविण्यासाठी ना हरकत प्रस्ताव पाठवावा, अशी मागणी माजी नगरसेवक विशाल डोळस यांनी नवी मुंबई महापालिका आयुक्तांकडे केली आहे.

सीवुडस सेक्टर ४६ येथील सर्विस रोडवर गेली अनेक वर्षे स्थानिक नागरिक व्यायाम आणि जॉगिंग करत आहेत, परंतु काही दिवसांपूर्वी या रोडच्या शेजारी मोठ्या संकुलाचे बांधकाम सुरू झाल्याने भविष्यात याठिकाणी वाहनांची रहदारी वाढून हा रस्ता वापरासाठी आणला जाऊ शकतो. त्यामुळे शेकडो लोकांना ह्या दैनंदिन आणि महत्वपूर्ण ॲक्टिविटीपासून वंचित राहावे लागणार आहे.

गेली अनेक वर्षापासूनची सेक्टर ५० येथील एसटीपी केंद्र ते एक अँड टी ब्रीज पर्यंत जॉगिंग ट्रॅक बनविण्याची मागणी पर्याय ठरू शकते. याकरिता काही वर्षापूर्वी महासभेत ठराव मंजूर झाला होता ह्याबाबत सिडकोकडे ना हरकत मागण्यात आली होती, परंतु त्यावेळी सिडकोने



नकार दिला होता. पालिकेने जॉगिंग ट्रॅकसाठी सिडकोकडे ना हरकत प्रमाणपत्राची मागणी करून जॉगिंग ट्रॅक उपलब्ध करावा, अशी मागणी माजी नगरसेवक विशाल डोळस यांनी आयुक्तांकडे केली आहे.

## खारघरमध्ये धम्मचक्क अनुपवत्तन दिन आणि वर्षावास समारोप

**खारघर : रामप्रहर वृत्त**

धम्म उपासिका संघाच्या वतीने रविवारी (दि. ५) खारघर, सेक्टर १२ मधील बुद्धविहारात धम्मचक्क अनुपवत्तन दिन आणि वर्षावास समारोप कार्यक्रम आयोजित केला आहे.

सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत धम्म रॅली, भोजनदान, संपूर्ण बुद्धपूजा पाठ, धम्मदेसना आदी विविध कार्यक्रम होणार आहेत. या कार्यक्रमाला रहिवाशांनी उपस्थित राहावे, असे आवाहन बुद्धविहार सेक्टर १२, पंचशील बुद्धविहार, सेक्टर १५ आणि धम्म उपासिका संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

## स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज सोहळा उत्साहात

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

अनंत श्री विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज यांचा समस्या मार्गदर्शन व दर्शन सोहळा आणि साधक दीक्षा समारंभ नुकताच जगद्गुरु नरेंद्राचार्यजी महाराज संस्थान, पालघर येथे मोठ्या उत्साहात झाला. या सोहळ्याला नवी मुंबईतील विविध मठ आणि आश्रमातील भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली.



अध्यात्मिक कार्यक्रमासोबत जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थानाचा मरणोत्तर देहदान उपक्रम, ब्लड इन नीड उपक्रम अंतर्गत आजपर्यंत, २०,००० रुग्णांना रक्त देऊन त्यांचे प्राण वाचविले. जनम संस्थानच्या माध्यमातून ५२ रुग्णवाहिका २४ तास कार्यरत असून आतापर्यंत १९३३० हून अधिक जखमींचे प्राण वाचविले आहे.

उपपीठ मुंबई येथे सुशिक्षित बेरोजगार युवकांना विनामूल्य मोटर ट्रेनिंग देऊन रोजगार उपलब्ध करून दिले आहे. श्रीक्षेत्र मोफत अन्नदान सेवा मोफत इंग्रजी माध्यमाची शाळा उपक्रम, कृषी साठी अत्यावश्यक उपक्रम तसेच आर्थिक मदत अशा अनेक अनेक उपक्रम संस्थानांमार्फत राबविले जातात.

# कोजागरी पौर्णिमेनिमित्त पनवेलमध्ये चंद्रगीतांची बरसात




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलकरांसाठी वर्षभर सतत विविधरंगी कार्यक्रमांचे आयोजन करणार्या पनवेल कल्चरल असोसिएशनने कोजागरी पौर्णिमेनिमित्त चंद्रगीतांचा बहारदार कार्यक्रम नवीन पनवेल येथील कर्नाटक संघात, कर्नाटक संघ, पनवेल यांच्या सहयोगाने सादर केला.

यात १२ गायक-गायिकांनी मराठी-हिंदी व कन्नड चंद्रगीते सादर केली. मिलिंद गोखले यांनी चांद माझा हा हासरा आणि शुक्रतारा.. संध्या घाडगे यांनी उगवला चंद्र पुनवेचा.., चांदण्यात फिरताना.. चांदणे शिंपीत जाशी.. आणि यू सजा चाँद.., आकांक्षा भोईर यांनी रात का समां.., शारद सुंदर चंदेरी राती.., चैत्राली देसाई हिने विकल मन आज झुरत असहाय.., मिलींद पर्वते यांनी प्रीतीच्या चांदराती.. आणि ये रात ये चांदनी.., दीपक मानकामे यांनी मैने पूछा चाँदसे.., डॉ. शिल्पा वैशंपायन यांनी वो चांद खिला.., किशोर निवेतकर यांनी चांद आहें भरेगा.. आणि चांद को क्या मालूम.., सई मराठे यांनी शुक्रतारा आणि निंबोणीच्या झाडामागे.., दिशा पाटील हिने आओ तुम्हें चांद पे ले जाये.. आणि गली में आज चांद निकला.. ही गीते सादर केली. रोहिणी मध्यस्थ यांनी विजया वाणी आणि पावन गंगा या चित्रपटातली दोन कन्नड गीते सादर केली.

या सर्व गाण्यांच्या ट्रॅकचे संयोजन राहुल महाजनी याने केले. नाट्यगीतांना हार्मोनियम साथ संध्या घाडगे, तर तबलासाथ विनायक प्रधान यांनी केली. अनिल हर्डीकर यांनी निवेदन केले.

# नवी मुंबईत रंगले फूड फेस्टिव्हल

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

वाशीतील आय लीफ बँक्वेट्समध्ये गत रविवारी भव्य असे पर्पल प्लेट फूड फेस्टिव्हलचे आयोजन करण्यात आले होते. या फेस्टिव्हलमध्ये भारतीय तसेच चायनीज, जापनीज पाककृतींचे खाद्यपदार्थ आणि मिष्ठान्नांच्या स्वादिष्ट अशा २०० हून अधिक डिशेसचा समावेश होता. आय लीफ बँक्वेट्सच्या तीन भागांमध्ये विभागलेल्या या फूड फेस्टिव्हलमधील मेजवानीचा उपस्थितांनी मनमुराद आनंद लुटला.

हा फूड फेस्टिव्हल केवळ खाद्यपदार्थांचा उत्सव नसून तो विविध सांस्कृतिक पार्श्वभूमी आणि समाजातील लोकांचा उत्सव असल्याचे आय लीफ बँक्वेट्सचे व्यवस्थापकीय संचालक प्रतीश आंबेकर यांनी सांगितले. हा फेस्टिव्हल यशस्वी करण्यासाठी तसेच प्रत्येक डिश बनवणासाठी कुशल सहकाऱ्यांनी व शेफने अथक मेहनत घेतल्याचेही आंबेकर यांनी सांगितले. चार वर्षांपासून याचे यशस्वी आयोजन करण्यात येत आहे. ग्राहकांकडून या फूड फेस्टिव्हलला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे व भविष्यात आणखी काही सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणार असल्याचे आंबेकर यांनी सांगितले.

## महाराष्ट्र राज्य सत्संग महोत्सव

**नवी मुंबई :** युगपुरुषोत्तम परमप्रेममय श्री ठाकूर अनुकूलचंद्रजींचा १३६ वा शुभ जन्मोत्सव आणि महाराष्ट्र राज्य सत्संग महोत्सव रविवारी, १० डिसेंबर २०२३ रोजी सकाळी सात वाजल्यापासून पूर्ण दिवस सिडको एक्झिबिशन आणि कन्व्हेंशन सेंटर वाशी नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमात प्रार्थना, नामध्यान, भजन, कीर्तन, डीपी वर्क, इष्ट चर्चा, भंडारा, सांस्कृतिक कार्यक्रम, आरोग्य शिबिर, छायाचित्र, प्रदर्शन, पुस्तक विक्री व इतर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या महामहोत्सवात उपस्थित राहण्यासाठी सर्वांना आयोजकांतर्फे आवाहन करण्यात आले आहे.

# अत्रे कट्ट्यातर्फे शूरां मी वंदिले कार्यक्रम

**पनवेल : वार्ताहर**

एकंदरीत जवानांची आठवण न ठेवणं, त्यांना अपमानास्पद वागणूक देणं हे भारतीयांचे वैचारिक अध:पतन असल्याचं मत ख्यातनाम निवेदिका अनघा मोडक यांनी नवीन पनवेलमधील ज्येष्ठ नागरिक संघाच्या सभागृहात काढले. नवीन पनवेलच्या आचार्य अत्रे कट्ट्यातर्फे आयोजित शूरां मी वंदिले या कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

त्यापुढे म्हणाल्या, जवानांना तिरंगा म्हणजे आयुष्य नांवाच्या काठीवर जन्म, जगणं आणि मृत्यू चक्राकार फिरत ठेवून स्वतः चं अस्तित्व लहरत ठेवणं आहे. आज सीमेवर पहारा देत आपल्या सुरक्षेचं तेज ते खऱ्या अर्थाने वाढवत असल्यानं आपण निश्चिंत जगत आहोत. तरीदेखील आज भारतात जवानांना तितकासा मान दिला जात नाही ज्या ज्या वेळेस आपणांस जवानांचं विस्मरण होतं त्यावेळेस ते शहीद होत असतात आणि म्हणून जरा याद करो कुर्बानी असं कवीला सांगावंसं वाटतं, असं मत त्यांनी




व्यक्त केलं.

स्वातंत्र्योत्तर काळात स्वातंत्र्य टिकवून ठेवणं जास्त कठीण होत आहे कारण विवेक, बुद्धी, विचार व सद् भावनेवरील भारतीयांची पकड ढिली पडत चालली आहे. असे प्रतिपादन करून सैन्यातील शिस्तीविषयी त्या म्हणाल्या, अपयश कसं पचवायचं याचं शिक्षण त्यांना दिलं जातं. सैनिक ही वृत्ती असून शिस्तीच्या प्रवृत्तीतून त्यांना निर्व्याज प्रेम, समता, सद् भावना यातून सामान्य माणसापेक्षा अभिमानानं व्यापक कसं जगायचं हे शिक्षण मिळाल्याने ते सामान्य जनांपेक्षा समाधानाने कर्तव्य पूर्ण जीवन जगत असतात. यामुळेच ते इतरांपेक्षा उजवे ठरतात म्हणूनच त्यांच्या अस्तित्वाला सलाम. त्यांच्या शिस्तीविषयी युवकांमध्ये गोडी निर्माण करायची तर बालवयातच वॉटर पार्क सारख्या ठिकाणी सहली न नेता एन.डी.ए., सैनिक शाळा, लष्करी प्रदर्शने अशा ठिकाणी सहली नेण्याचे आवाहन अनघा मोडक यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मनिषा तांबोळी, स्वागत संध्या कोरडे यांनी तर आशा व्यास यांनी वंदेमातरम सादर केले.

# महिला बचत गटांना बाजारपेठ मिळाल्यास आर्थिक सुबत्ता -ना. आदिती तटकरे




**माणगाव : प्रतिनिधी**

विविध सणांच्या माध्यमातून महिला बचत गटांच्या उत्पादनांना बाजारपेठा उपलब्ध करून दिल्यास महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम होतील, असे प्रतिपादन महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी माणगाव येथे कार्यक्रमात बोलताना व्यक्त केले.

उमेद, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनान्नोती अभियान अंतर्गत पंचायत समिती माणगाव हिरकणी संपूर्ण दिवाळी एकाच ठिकाणी कार्यक्रमाचे उद्घाटन पंचायत समिती कार्यालयात शुक्रवारी (दि. ३) ना. आदिती तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त फळांची व फुलांची लावण्यात आलेल्या ७५ वृक्षांच्या अमृत रोपवाटिकेची उद्घाटनही करण्यात आले. या कार्यक्रमास रायगड प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे, शीतल फुंड, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष सुभाष केकाणे, पंचायत समिती माजी सभापती संगीता बक्कम, महिला आघाडी शहराध्यक्ष योगिता चव्हाण, गटविकास अधिकारी उच्च श्रेणी संदिप जठार, महिला बचत गट महासंघाच्या तालुकाध्यक्षा देविका पाबेकर, माजी उपनगराध्यक्ष रत्नाकर उभारे, उणेगाव माजी सरपंच राजेंद्र शिर्के, नगरसेविका रिया उभारे, नगरसेविका सुशीला वाढवळ, कृषी अधिकारी बाळकृष्ण काप, किशोरी हिरवे, तालुक्यातील ग्रामसेवक, ग्रामसेविका, तहसील व पंचायत समिती कार्यालयाचे अधिकारी तसेच महिला बचतगटाच्या प्रतिनिधी उपस्थित होते.

माणगाव पंचायत समिती कार्यालय याठिकाणी हिरकणी संपूर्ण दिवाळी एकाच ठिकाणी महिला बचत गटाच्या माध्यमातून साकारण्यात आलेल्या दिवाळीसाठी लागणारे वेगवेगळे साहित्य व खाद्यपदार्थांच्या दुकानातून नागरिकांना बाजारभावापेक्षा कमी दराने चांगल्या प्रकारच्या वस्तू खरेदी करता येणार आहेत.

ना. आदिती तटकरे पुढे म्हणाल्या की, सर्वांचे मी मनापासून अभिनंदन करते. याठिकाणी महिला बचत गटाने दिवाळी सणाच्या निमित्ताने दिवाळीसाठी लागणारे वेगवेगळे साहित्य व खाद्य पदार्थांची दुकाने चांगल्या प्रकारे सजविली आहेत. महिला बचतगटांना दिवाळी सणाच्या निमित्ताने याठिकाणी तात्पुरती बाजारपेठ उपलब्ध करून देण्यात आली आहे. माणगावमधील महिला बचत गट वेगवेगळे कार्यक्रम राबवित असून त्यांचा आदर्श इतर तालुक्याने घेण्यासारखा आहे. माणगावात हिरकणी संपूर्ण दिवाळी एकाच ठिकाणी कार्यक्रमाचे चांगल्या प्रकारे आयोजन करण्यात आले असून सर्व महिला बचत गटांचे खास कौतुक करते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन महिला बचत गट महासंघाच्या तालुकाध्यक्ष देविका पाबेकर यांनी केले.

# लाकडांची विनापरवाना वाहतूक करणाऱ्यांवर वनविभागाची कारवाई

## पोलादपुरात सहा जणांसह ट्रॅक्टर आणि जेसीबी ताब्यात

**महाड : प्रतिनिधी**

पोलादपूर तालुक्यातील ओंबळी बौद्धवाडी रस्त्यावर गस्त घालत असताना लाकडांची विनापरवाना वाहतूक करणाऱ्यांवर वनविभागाने कारवाई केली आहे. यामध्ये सहा जणांसह ट्रॅक्टर आणि जेसीबी वनविभागाने चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे.

तालुक्यातील ओंबळी बौद्धवाडी रस्त्यावर वनक्षेत्रपाल राकेश साहू आणि त्यांचे पथक गस्त घालत असताना दोन ट्रॅक्टरमध्ये आंब्याचे भले मोठे लाकूड आणि साग वाहतूक करताना आढळली. याबाबत चौकशी केली असता वाहतूक करणाऱ्या लोकांकडे कोणत्याच प्रकारचे कागदपत्रे आढळली नाहीत. यामुळे विनापरवाना वाहतूक करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याकरीता वनविभागाने ताब्यात घेतले आहे. वनाधिकारी राकेश साहू यांनी माहिती देताना, ओंबळी गावाजवळ ही विनापरवाना लाकूड वाहतूक आढळून आल्याचे सांगितले. यामध्ये नऊ जणांना चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. त्यांच्याकडे दोन ट्रॅक्टर, एक जेसीबी, एक स्कूटर, तसेच आंब्याची दोन लाकडे, साग असा मुद्देमाल ताब्यात घेतला आहे. ताब्यात घेतलेल्यांमध्ये सूर्यकांत सुरेश तांबे (वय ३८, रा. मांडवे), दिनेश रामदास तांबे (वय ४५, रा. कोरेगाव, खेड), अनिल धर्मा चव्हाण, ट्रॅक्टरचालक सुकिवली खेड, संदीप श्रीकांत पाटणे (वय ४२, रा. भरणे नाका), रजनिष मनिराम निसाद (वय २४, रा. अकबरपुर, यूपी, जेसीबी चालक), शेखर यशवंत शिंदे (वय ३२, रा. कोरेगाव खेड), कपिल देव (रा. नीसाद यूपी सध्या पोलादपूर जेसीबी हेल्पर), अमेष जयराम तांबट (वय ३०, रा. कोरेगाव खेड), बबन लक्ष्मण तांबे (वय ४०, रा. मांडवे) यांचा समावेश आहे.

यांच्याविरोधात भारतीय वन कायदा अधिनियम १९२७ कलम ४१, ४२ अन्वये गुन्हा दाखल केला जाणार असल्याची माहिती वनपरिक्षेत्राधिकारी राकेश साहू यांनी दिली. या पथकामध्ये वनपरिक्षेत्र अधिकारी राकेश साहू, वनपाल संजय चव्हाण, संदीप परदेशी वनरक्षक अतिरिक्त कार्यभार पोलादपूर, वन रक्षक कोतवाल पी. डी. जाधव वनरक्षक, यांचा समावेश होता.



# अष्टमी रेल्वेगेटवरील उड्डाणपुलाची खासदार सुनील तटकरेंकडून पाहणी



**रोहे : प्रतिनिधी**

खासदार सुनील तटकरे यांनी गुरुवारी (दि. २) अष्टमी येथील होत असलेल्या रेल्वेगेटवरील उड्डाणपुलाच्या कामाची पाहणी केली.

या उड्डाणपुलाचा नागरिकांना फायदा होणार असून त्यामुळे त्यांचा प्रवास सुलभ होणार आहे. खासदार सुनील तटकरे यांनी ठेकेदारांना सूचना देत काम लवकरात लवकर व्हावे, असे सांगितले.

या वेळी राष्ट्रवादी प्रदेश सरचिटणीस विजयराव मोरे, जिल्हा सरचिटणीस सुरेश मगर, जिल्हा उपाध्यक्ष शंकरराव भगत,तालुका अध्यक्ष विनोद पाशिलकर, माजी उपसभापती रामचंद्र सकपाळ, नगरपरीषद गटनेते महेंद्र गुजर, नगरसेवक महेश कोलटकर, समिर सकपाळ, राजेंद्र जैन, रवी चाळके, युवा नेते नवनीत डोलकर, निडीतर्फे अष्टमी सरपंच अक्षरा डोलकर, राजेंद्र पोकळे, हसमुख जैन, संदिप चोरगे, अनंत चौलकर, अरविंद मगर, मुकेश भोकटे, मोरेश्वर खरीवले, दिपक देशमुख, संकेत देशमुख, तानाजी देशमुख आदी उपस्थित होते.

खासदार सुनील तटकरे यांनी त्यानंतर सोनगाव, धामणसई, पिंगळसई या ठिकाणी जाण्यासाठी रस्ता कशा पद्धतीचा असेल याची माहिती घेतली. रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी जयस्वाल यांना फोन करीत पडम गेट येथे भुयारी मार्ग न करता उड्डाणपूल करण्यासंदर्भात चर्चा केली.

# तांबाटी ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत भाजपला अनुकूल वातावरण

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील औद्योगिक वसाहत असलेल्या ग्रुप ग्रामपंचायत तांबाटीच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे नेते, माजी सरपंच व सरपंचपदाचे उमेदवार अनिल जाधव यांचे पारडे जड असल्याचा दावा कार्यकर्ते करीत आहेत.



खालापूर तालुक्यातील आर्थिक सुबत्ता असलेली ग्रामपंचायत म्हणून तांबाटी ग्रामपंचायतीकडे पाहिले जाते. येथे थेट सरपंचपदासाठी भाजपचे अनिल जाधव यांनी आपला उमेदवारी अर्ज सादर केला असून त्यांच्या मागील पाच वर्षांपासून त्यांनी ग्रामपंचायत हद्दीत केलेल्या विकासकामांना येथील जनतेने लक्षात ठेवले असून सामान्य माणूस त्यांच्या प्रचारासाठी तन मन अर्पन करून प्रचार करीत असल्याचे चित्र दिसत आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिलेला उमेदवार म्हणजे जनतेच्या हिताचे रक्षण करणारा उमेदवार असे या परिसरात म्हटले जाते. अनेक विकासांची कामे थेट सरपंच उमेदवार अनिल जाधव यांच्या नावावर असल्यानेच आमदार प्रशांत ठाकूर यांनी त्यांच्यावर विश्वास टाकून त्यांना उमेदवारी दिली आहे. नागरिकांमधूनही त्यांना सकारात्मक प्रतिसाद मिळत असल्याचे कार्यकर्त्यांनी सांगितले असून येथे भाजपचा विजय निश्चित असल्याचे सांगितले.

# वडगाव शाळेच्या विद्यार्थ्यांनी बांधले वनराई बंधारे

**खोपोली : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद शाळा वडगावचे मुख्याध्यापक सुभाष राठोड यांच्या संकल्पनेतून आणि तालुका कृषी अधिकारी सुनिल निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ कृषी अधिकारी प्रशांत कदम यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांनी परिसरात वनराई बंधारे बांधण्यात आले.

शिक्षक विद्यार्थ्यांना वनराई बंधारे कसे असते त्यांचे महत्त्व समजण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. बंधारा बांधण्यासाठी सिमेंटच्या गोणीमध्ये माती भरून ज्या ठिकाणी पाण्यांचा प्रवाह आहे त्या ठिकाणी एकावर एक रचण्यात आले. काही तासांतच वनराई बंधारे बांधून पूर्ण झाले. हे बंधारे बांधल्यामुळे जमिनीची धूप कमी होते, शिवाय भूजल पातळी वाढण्यास मदत होते. त्याच वन्यजीवांचा काही महिने पिण्याच्या पाण्यांचा प्रश्न मार्गी लागतो. बंधारे एक मात्र फायदे अनेक



असते असे मार्गदर्शन करण्यात आले.

या वेळी मंडळ कृषी अधिकारी प्रशांत कदम, अंगणवाडीसेविका नीता राऊत, शाळेचे मुख्याध्यापक सुभाष राठोड, विषय शिक्षिका सरस्वती कवाद, स्वयंसेविका निकिता गडगे व साक्षी जांभुळकर, पोस्टमन सगर तसेच ग्रामस्थ, माजी विद्यार्थी मयुर ठोंबरे तसेच शाळेचे सर्व विद्यार्थी या वनराई बंधारे बांधण्यासाठी उपस्थित होते.

# खालापुरात भातशेती तयार; कापणीला मजुरांचा अभाव

**खोपोली : प्रतिनिधी**

तालुक्यातील भातशेती तयार झाली असून आता कापणीयोग्य झाली आहे, मात्र शेतमजुरांच्या कमतरतेमुळे भातकापणीसह अन्य शेतीची कामे होण्यास विलंब होत आहे.

कडक उन्हामुळे भाताच्या लोंब्यांपासून भाताचे दाणे अलग होत आहेत. या वर्षी भातपिक उत्तम आले, मात्र कमी पावसामुळे वजन कमी भरून काही प्रमाणात नुकसानही सोसावे लागणार आहे. परंपरागत कामे करणारे स्थानिक मजूरांवर भातपीकांची कापणी ही प्रामुख्याने अवलंबून असते, परंतु स्थानिक शेतमजूरांची दिवसेंदिवस कमी होत असलेली संख्या यामुळे शेतमजूरांचा प्रचंड तुटवडा जाणवत आहे.

दुर्गम भागातून येणारे मजूर हे दिवाळीपूर्वी परतीच्या प्रवासाला लागत असल्याने आता जे उपलब्ध होतील त्यांची मनधरणी करून लवकरात लवकर भातकापणी आटोपून घेण्याच्या प्रयत्नात शेतकरी वर्ग आहे. भातामधील तांदळाचा दाणा टणक बनून तुटण्याची शक्यता अधिक असल्याने ठराविक वेळेत भातकापणी झाली नाही तर शेतकऱ्यांना अनेक संकटांना तोंड द्यावे लागणार आहे. अशास्थितीत भातकापणीची कामे घाईगडबडीत उरकण्यात येत आहेत. काही भागात मजूर उपलब्ध होत नसल्याने घरच्या घरी भातकापणीसमवेत भातझोडणी सुरू झाली आहे.

**भातशेती कापणीयोग्य झाली आहे, मात्र रोख मजुरी देऊनही भातकापणीसाठी मजूर मिळत नसल्याने घरातील सर्व सदस्यांना या कामी जुंपवावे लागणार आहे.**

**–निलेश टट्टू, शेतकरी, महड**



# उसर वावे परिसरात भ्रष्टाचारविरोधात जनजागृती

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

गेल इंडिया लिमिटेड, उसरच्या माध्यमातून स्थानिक परिसरात सतर्कता जागरूकता सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. या सप्ताहांतर्गत प्रिझम संस्थेच्या कलाकारांनी भ्रष्टाचारमुक्त भारत या पथनाट्याद्वारे गेल कंपनीच्या प्रांगणात व वावे नाका परिसरात भ्रष्टाचार निर्मूलनविषयक जनजागृती केली. या वेळी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

या वेळी मुख्य महाप्रबंधक पीडीएच–पीपी व प्रभारी अधिकारी अनूप गुप्ता, महाप्रबंधक (पीडीएचपीपी) परियोजना विरेंद्र कुमार, एम. कासिवेलराजन– महाप्रबंधक (पीडीएच –पीपी परियोजना), महाप्रबंधक (मा.सं.) जितिन सक्सेना, मुख्य प्रबंधक एलविना आयझॅक, ऑफिसर सिक्युरिटी परमजीत सिंग, प्रिझम संस्थेच्या अध्यक्षा तपस्वी नंदकुमार गोंधळी, गेल कंपनीचे कर्मचारी उपस्थित होते.

प्रतिक कोळी लिखित, दिग्दर्शीत या पथनाट्यात विनोदी नकलाकार विनोद नाईक, यांचेसह अथर्व भगत, नेहा पाटील, श्रावणी राऊत, माधवी म्हात्रे यांनी कलाकार म्हणून आपला सहभाग नोंदविला तर विजय शिंदे यांनी सुश्राव्य स्वरूपात ढोलकीची साथ दिली.

# कडापे ग्रामपंचायतीत शिवसेनेचा घरोघरी प्रचार



**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील निजामपूर विभागातील कडापे ग्रामपंचायतीची निवडणूक रविवारी (दि . ५) होत आहे. या निवडणुकीसाठी शिवसेनेने घरोघरी प्रचार करून मतदारांच्या गाठीभेटी घेतल्या आहेत.

या ग्रामपंचायतीत शिवसेनेला चांगले वातावरण असून ग्रामपंचायत हद्दीत आमदार भरत गोगावले व ग्रामपंचायतीच्या माध्यमातून झालेल्या कोट्यावधी रुपयांच्या विविध विकासकामांमुळे सरपंचासह आमचे सर्व उमेदवार चांगल्या मतांनी निवडून येतील, असा दावा माजी सरपंच व आता असलेले सदस्यपदाचे उमेदवार मारुती मोकाशी यांनी प्रचार फेरीदरम्यान व्यक्त केला.

ते म्हणाले की, कडापे ग्रामपंचायतीत कडापे, येरद, कांदळगाव, वाडी–वस्त्यांचा सहभाग असून यामध्ये ३ प्रभाग असून थेट जनतेतून सरपंच व सात सदस्य आहेत. प्रभाग क्रमांक १मधून शिवसेनेचे उमेश परशुराम मांढरे व सुलोचना रमेश दबडे हे दोन सदस्य बिनविरोध निवडून आले आहेत. कडापे ग्रामपंचायत हद्दीत आमदार भरत गोगावले यांनी विविध योजना राबविल्या असल्याने जनतेच्या आशीर्वादाने व शिवसेनेचे विजय होईल, असा दावा मोकाशी यांनी केला.

# मोहम्मद शमीचा ऐतिहासिक पराक्रम

## भारतासाठी विश्वचषकात सर्वाधिक विकेट्स घेणारा ठरला गोलंदाज

**मुंबई : प्रतिनिधी**

एकदिवसीय विश्वचषकात मोहम्मद शमी भारताकडून सर्वाधिक विकेट घेणारा गोलंदाज ठरला आहे. माजी दिग्गज वेगवान गोलंदाज जवागल श्रीनाथ आणि झहीर खान यांना मागे टाकून त्याने हा ऐतिहासिक विक्रम केला. शमीने स्पर्धेतील १४व्या डावात ४५ विकेट घेतल्या. अनुभवी जवागल श्रीनाथ आणि झहीर खान यांनी एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत भारताकडून ४४-४४ विकेट घेतल्या होत्या.




एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर श्रीलंकेविरुद्ध गुरुवारी खेळल्या गेलेल्या सामन्यात आधुनिक दिग्गज मोहम्मद शमीने अनोखी कामगिरी केली. शमीने श्रीलंकेविरुद्ध पाच षटकांत केवळ १८ धावा देत पाच विकेट घेतल्या. या काळात त्याने एक मेडन षटकही टाकले. या शानदार कामगिरीच्या जोरावर मोहम्मद शमीने सामनावीराच्या पुरस्कारावर आपले नाव कोरले.

इतर संघांच्या तुलनेत ऑस्ट्रेलियाला विश्वचषकात अधिक फायदा का होणार? झहीर खानने सांगितले, आयसीसी विश्वचषक २०२३चा तिसरा सामना खेळत असलेला शमी खूप चांगल्या फॉर्ममध्ये दिसत आहे. त्याने तीन सामन्यात १४ विकेट घेतल्या आहेत. शमीने न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या सामन्यात पाच विकेट घेतल्या होत्या. यानंतर भारतीय वेगवान गोलंदाजाने इंग्लंडविरुद्ध चार इंग्लिश फलंदाजांना आपले बळी बनवले. आता श्रीलंकेविरुद्ध त्याने पुन्हा पाच विकेट्स घेण्याचा पराक्रम केला आहे.

मोहम्मद शमीची एकूण विश्वचषकातील ही तिसरी वेळ आहे, जेव्हा त्याने एका डावात पाच विकेट्स घेतल्या आहेत. ज्यासह त्याने ऑस्ट्रेलियाच्या मिचेल स्टार्कची बरोबरी केली. शमीसाठी, त्याच्या एकदिवसीय कारकिर्दीतील हे चौथी वेळ आहे, जेव्हा त्याने पाच विकेट्स घेतल्या, तसेच तो एकदिवसीय क्रिकेटमध्ये भारतासाठी सर्वाधिक चार वेळा पाच विकेट्स घेणारा गोलंदाज बनला. त्याने माजी दिग्गज फिरकीपटू हरभजन सिंग आणि वेगवान गोलंदाज जवागल श्रीनाथ यांना मागे टाकले आहे, ज्यांनी त्यांच्या कारकिर्दीत एकदिवसीय सामन्यांमध्ये प्रत्येकी तीन वेळा पाच विकेट्स घेतल्या होत्या.

### वर्ल्डकपमध्ये सर्वात यशस्वी भारतीय गोलंदाज

**मोहम्मद शमी - ४५ विकेट्स (मॅच - १४)**
**झहीर खान -४४ विकेट्स (मॅच -२३)**
**जवागल श्रीनाथ -४४ विकेट्स (मॅच -३४)**
**जसप्रीत बुमराह -३३ विकेट्स (मॅच -१७)**

# रोलर स्केटिंग स्पर्धेत ‘सीकेटी’चा विनीत जाधव चॅम्पियन

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केले अभिनंदन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ऐरोली येथे, आरजीओआय रोलर स्केटिंग जिल्हा चॅम्पियनशिप २०२३-२४ ही स्पर्धा २९ ऑक्टोबर रोजी झाली. या स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या, चांगू काना ठाकूर मराठी प्राथमिक विद्यालयातील विद्यार्थी विनित विशाल जाधव या विद्यार्थ्याने सहभाग घेऊन गोल्ड मेडल पटकावून दैदिप्यमान यश प्राप्त केले.

संथेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. दशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस. टी. गडदे, चेअरमन चंद्रकांत घरत (भागुबाई चांगू ठाकूर विद्यालय द्रोणागिरी) तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.

# जलतरण स्पर्धेत वीरधवल खाडे, पलक जोशी यांचे दुहेरी यश

**पणजी : वृत्तसंस्था**

वीरधवल खाडे आणि पलक जोशी या महाराष्ट्राच्या जलतरणपटूंनी गुरुवारी (दि. २) दुसऱ्या सुवर्णपदकाला गवसणी घालत आपले वर्चस्व प्रस्थापित केले. महाराष्ट्राने गुरुवारी राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत जलतरण या खेळामध्ये दोन सुवर्णपदकांसह दोन रौप्य व एक ब्राँझ अशी एकूण पाच पदकांवर मोहोर उमटवली.

ऑलिंपियन वीरधवलने ५० मीटर बटरफ्लाय शर्यत २४.६० सेकंद अशा विक्रमी वेळेत जिंकली आणि २०१५मध्ये त्यानेच नोंदवलेला २४.७३ सेकंद हा विक्रम मोडला. बुधवारी त्याने येथे ५० मीटर फ्रीस्टाईल शर्यत जिंकून वेगवान जलतरणपटूचा




मान मिळवला होता. याच शर्यतीत ब्राँझपदक जिंकणाऱ्या मिहीर आंम्ब्रेने वीरधवलच्या पाठोपाठ ५० मीटर बटरफ्लाय शर्यत २४.६७ सेकंदांत पूर्ण करीत रौप्यपदक जिंकले.

पुरुषांच्या १०० मीटर बटरफ्लाय शर्यतीत महाराष्ट्राच्या ऋषभ दासने ५७.३७ सेकंद वेळ नोंदवत रौप्यपदक जिंकले. या शर्यतीत ऑलिंपियन श्रीहरी नटराजन (५५.५९ सेकंद) हा सुवर्णपदकाचा मानकरी ठरला.

महिलांच्या १०० मीटर शर्यतीत महाराष्ट्राच्या पलक जोशीने सोनेरी कामगिरी केली. तिने हे अंतर एक मिनीट व ०५.२९ सेकंदांत पार केले.

### वॉटरपोलोमध्ये दोन्ही संघ उपांत्य फेरीत

*वॉटरपोलो या खेळामध्ये महाराष्ट्राच्या खेळाडूंनी पुरुष व महिला या दोन्ही विभागांमध्ये विजयी मालिका कायम ठेवत राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत उपांत्य फेरीकडे वाटचाल केली. पुरुष विभागात महाराष्ट्राने चुरशीच्या लढतीनंतर केरळ संघावर ६-४ अशी मात केली. महाराष्ट्र संघाकडून आतापर्यंत झालेल्या सामन्यांमध्ये गौरव महाजनी व पियूष सूर्यवंशी यांनी सातत्यपूर्ण कामगिरी केली आहे. महिला विभागात महाराष्ट्राने कर्नाटक संघावर १५-७ असा दणदणीत विजय मिळवला.*

# सचिन तेंडुलकरचे मुलींच्या हक्कांसाठी आवाहन

**मुंबई : प्रतिनिधी**

युनिसेफचे दक्षिण आशिया क्षेत्रीय राजदूत आणि क्रिकेटचे दिग्गज खेळाडू सचिन तेंडुलकर यांनी गुरुवारी मुंबईत भारत-श्रीलंका सामन्यादरम्यान श्रीलंकेचे क्रिकेट आयकॉन मुथय्या मुरलीधरन यांच्यासोबत मुलांसाठी एका दिवसाचे नेतृत्व केले आणि लिंग समानतेचे आवाहन केले. ‘एक दिवस मुलांसाठी’ या आयसीसी-युनिसेफ भागीदारी अंतर्गत भारतामध्ये होणाऱ्या आयसीसी पुरुष विश्वचषक क्रिकेट २०२३दरम्यान मुलांच्या समस्या आणि त्यांचे हक्क यांचे समर्थन करण्यासाठी




एक महत्त्वपूर्ण उपक्रम आहे.

सामन्याच्या दुसऱ्या डावात, सचिन तेंडुलकर आणि मुथय्या मुरलीधरन यांनी प्रतिकात्मक बटण दाबताच ३२,००० प्रेक्षक क्षमता असलेले वानखेडे स्टेडियम निळ्या रंगात उजळले.

विश्वचषक हा लोकांना एकत्र आणण्यासाठी आणि प्रत्येक मुलासाठी आशा आणि समानतेचा प्रचार करण्यासाठी एक योग्य क्षण आहे. मला आनंद होत आहे की, श्रीलंका आणि भारत यांच्यातील आजचा सामना हा मुलांसाठी समर्पित सामना आहे, असे क्रिकेटचे आयकॉन सचिन तेंडुलकर म्हणाले. मी खेळाडूंना, येथील आणि जगभरातील प्रेक्षकांना आणि आयसीसीच्या भागीदारांना विनंती करतो की, सर्वांनी लिंगभेदभाव न करता, मुलामुलींना समान वागणूक देण्याची आणि सर्व मुलांना, विशेषत: मुलींना समान अधिकार असलेल्या जगाची निर्मिती करण्याची प्रतिज्ञा करावी. मी प्रत्येकाला मुलांसाठी चॅम्पियन बनण्याचे आवाहन करतो आणि लिंग असमानता एकत्रितपणे संपवण्याची प्रतिज्ञा करतो!

# ॲथलेटिक्स आणि कबड्डी स्पर्धेत महात्मा फुले महाविद्यालयाचे वर्चस्व

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या पनवेल येथील महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाने मुंबई विद्यापीठामार्फत आयोजित मुंबई झोन क्र. १च्या आंतरमहाविद्यालयीन महिला कबड्डी व ॲथलेटिक्स स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

मुंबई झोन १च्या ॲथलेटिक्स स्पर्धेत १० किमी धावणे या क्रीडा प्रकारात प्रेम संतोष ठाकूर (बीए.तृतीय वर्ष )या विद्यार्थ्याने सुवर्णपदक व स्वप्नील सुखदेव पडघन (बीए. प्रथम वर्ष) याने रौप्यपदक पटकाविले. ३००० मी. ट्रिपल चेस या क्रीडाप्रकारात सचिन अंबाजी वारघुडे (एम. एसस्सी) या विद्यार्थ्याने कांस्यपदक आणि १५०० मी. धावणे या क्रीडाप्रकारात मनिष प्रकाश नाईक (बीए. तृतीय वर्ष) याने रौप्यपदक मिळविले.

मुंबई विद्यापीठ कबड्डी स्पर्धेमध्ये मुलींच्या संघाने सुवर्णपदक प्राप्त केले. महाविद्यालयातील रश्मी पाटील (बीए. तृतीय वर्ष), ऋतुजा पाटील (बीए. द्वितीय वर्ष) व रुपाली जाधव (बी. कॉम. द्वितीय वर्ष) या मुंबई विद्यापीठाच्या आंतरविभागीय



स्पर्धेसाठी निवड करण्यात आलेल्या तीन अव्वल खेळाडूंचा यात सहभाग होता.

प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांनी सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. मुंबई विद्यापीठाच्या क्रीडा स्पर्धांमध्ये अतिशय उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सर्व खेळाडूंचा अभिमान वाटत असल्याचे सांगितले. रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, सचिव विकास देशमुख, महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, संस्थेच्या रायगड विभागीय सल्लागार समितीचे चेअरमन बाळाराम पाटील, जे. एम. म्हात्रे, महेंद्र घरत, अरुणशेठ भगत तसेच शिवछत्रपती पुरस्कार विजेते सूर्यकांत ठाकूर आदींनी विशेष कौतुक केले.

विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या जिमखाना कमिटीचे चेअरमन डॉ. प्रफुल्ल वशेणीकर, उपप्राचार्य डॉ. राजाराम पाटील, उपप्राचार्य डॉ. नरेश मढवी, कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या श्रीमती वाजीदा सिद्दवत्तम, आयक्यूएसी समन्वयक प्रा. सोपान गोवे, प्रा. प्रवीण गायकर, प्रशिक्षक अक्षय जितेकर, तेजा महादेव सपकाळ व जिमखाना कमिटीतील सर्व सदस्यांनी मार्गदर्शन केले.

# जलतरणपटू ध्रुव मोहिते याचा विशेष सत्कार



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील उदयोन्मुख युवा क्रीडापटू, कलावंत आपल्या उल्लेखनीय कामगिरीमुळे नवी मुंबईच्या नावलौकिकात लक्षणीय भर घालत आहे. त्यांचा यथोचित सन्मान करून पुढील वाटचालीसाठी प्रोत्साहन देण्याचे काम महापालिका करीत आहे असे सांगत आयुक्त राजेश नार्वेकर यांनी ध्रुव अतुल मोहिते या युवकाने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर जलतरण क्रीडा प्रकारात केलेल्या विक्रमांबद्दल गौरव केला.

२० वर्षीय सागरी जलतरणपटू ध्रुव मोहिते यांनी अरबी समुद्रातील पाच खाड्या पोहून पार केल्या असून त्यांच्या नावे जलदगती जलतरणपटू म्हणून एक वेळा आशिया बुक ऑफ रेकॉर्ड, चार वेळा इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड आणि दोन वेळा बेस्ट ऑफ इंडिया रेकॉर्डमध्ये नोंदविले गेले आहे. अशा विक्रमांची नोंद असणारे ते मान्यताप्राप्त सागरी जलतरणपटू असून त्यांना विविध संस्थांमार्फत सन्मानित करण्यात आले आहे.

नवी मुंबई महानगरपालिका क्रीडा व सांस्कृतिक कार्य विभागाने महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या शुभहस्ते महापालिका मुख्यालयातील ज्ञान केंद्रात ध्रुव मोहिते यांचा विशेष सन्मान करीत त्यांना शाल, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह प्रदान केले आहे.

या वेळी अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले व विजयकुमार म्हसाळ, प्रशासन विभागाचे उपआयुक्त शरद पवार, शहर अभियंता संजय देसाई, क्रीडा व सांस्कृतिक कार्य विभागाच्या उपआयुक्त ललिता बाबर, शिक्षण विभागाचे उपआयुक्त दत्तात्रय घनवट, सहा. संचालक नगररचना सोमनाथ केकाण, महापालिका सचिव चित्रा बाविस्क्र, अतिरिक्त शहर अभियंता मनोज पाटील व शिरीष आरदवाड, क्रीडा अधिकारी अभिलाषा म्हात्रे व रेवप्पा गुरव आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

# कळंबचा युवा खेळाडू करणार राज्य कबड्डी संघाचे नेतृत्व

**इंदापूर : प्रतिनिधी**

कळंब, इंदापूर येथील किरण मगर या कबड्डीपट्टू खेळाडूची महाराष्ट्र पुरुष कबड्डी संघाच्या कर्णधारपदी निवड झाली आहे.

गोव्यामध्ये शनिवार (दि. ४) पासून ३७व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी महाराष्ट्राचा संघ निवडला असून १२ खेळाडूंचा समावेश आहे. किरण मगरची संघाच्या कर्णधारपदी निवड झाली असून, महाराष्ट्र संघाचे नेतृत्व करणार आहे.

किरणला सुरवातीपासून कबड्डीच्या खेळाची आवड आहे. कळंबमधील राणाप्रताप कबड्डीच्या संघातून त्याने अनेक जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय व राष्ट्रीय पाताळीवरील सामन्यामध्ये विजय मिळवून दिला आहे. गोव्यामध्ये होणाऱ्या कबड्डीच्या सामन्यामध्ये महाराष्ट्र राज्य कबड्डी संघाचे सरकार्यवाह बाबुराव चांदेरे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्याच्या संघाला यश देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. किरणच्या कर्णधार पदाच्या निवडीमुळे कळंब गावातील नागरिकांनी आनंद झाला असून त्याचे सगळीकडे कौतुक होत आहे.

# टीम इंडियात परतण्यापूर्वी ऋषभ पंतने घेतले तिरुपती बालाजीचे दर्शन



**अमरावती : वृत्तसंस्था**

सध्या जगभरात एकदिवसीय विश्वचषक २०२३ स्पर्धेची चर्चा आहे. यंदाचा विश्वचषक भारतात खेळला जात असून भारतीय संघाकडून या वेळी विश्वचषकाचे जेतेपद पटकावण्यासाठी सर्वांनाच मोठ्या अपेक्षा आहेत. दरम्यान, संघाचा यष्टिरक्षक फलंदाज ऋषभ पंत आंध्र प्रदेशातील तिरुपती बालाजी मंदिरात पोहचला.

पंतने भारतीय संघाला २०२३च्या विश्वचषक विजेतेपदासाठी प्रार्थना केली. त्याच्यासोबत अक्षर पटेलही आला होता. दोघांचे व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत आहेत.

गेल्या वर्षी ३० डिसेंबरला ऋषभ पंतच्या कारला दिल्लीहून त्याच्या मूळ गावी रुरकीला जात असताना अपघात झाला होता. या अपघातात पंत यांची कार पूर्णपणे जळून खाक झाली होती. त्याचबरोबर त्याला गंभीर दुखापत झाली.

त्यानंतर तो अनेक महिने रुग्णालयात होता. तेव्हापासून ऋषभ पंत टीम इंडियातून बाहेर आहे, पण आता तो बऱ्यापैकी रिकव्हर झाला आहे आणि लवकरच त्याचे टीममध्ये पुनरागमन होऊ शकते, मात्र पंत कधी आणि कोणत्या मालिकेत टीम इंडियात परतणार याबाबत अद्याप कोणतीही माहिती समोर आलेली नाही.









दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com